
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक ६ / जून २०२५

## संपादकीय

### जागतिक पर्यावरण दिवस

पर्यावरण हा आपल्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आपली आजूबाजूची परिस्थिती चांगली असेल तर आपल्याला समाधान वाटते, आपले आरोग्य चांगले राहाते आणि नवनवीन कामे हाती घेण्यास प्रेरणा मिळते. या उलट आजूबाजूचा परिसर गढूळ आणि अस्वच्छ असेल तर आपल्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. म्हणून परिसर चांगला ठेवणे अत्यावश्यक आहे. याची जाणीव समाजाला व्हावी यासाठी दरवर्षी 'जागतिक पर्यावरण दिवस' (World Environment day) साजरा करण्यात येतो. जून महिन्याची ५ तारीख यासाठी ठरविण्यात आली आहे. १९७२ च्या जून महिन्यात स्टॉकहोम शहरात संयुक्त राष्ट्रसंघाची एक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत 'मानवी पर्यावरण' या विषयावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. त्याच सभेत दरवर्षी ५ जूनला जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १९७३ च्या जूनपासून हा दिवस नियमितपणे साजरा करणे सुरू झाले. प्रत्येक वर्षी हा दिवस साजरा करण्याची जबाबदारी एका देशावर टाकली जाते. २०२५ चा जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्याची जबाबदारी दक्षिण कोरिया या देशाची होती. याआधी दोन वेळा भारताने ही जबाबदारी उचलली होती.

प्रत्येक वर्षी जागतिक पर्यावरण दिनासाठी एक वेगळा विषय घेतलेला असतो. या वर्षीचा विषय होता 'प्लॅस्टिकचे प्रदूषण'. प्लॅस्टिक हा एक कृत्रिम कार्बनी पदार्थ आहे. खनिज तेलात आढळणाऱ्या कार्बनी रसायनावर प्रक्रिया करून वेगवेगळ्या गुणधर्माचे प्लॅस्टिक बनविता येतात. आजच्या घडीला आपल्या जीवनातील अनेक कामांत प्लॅस्टिकचा वापर होऊ लागला आहे. अनेक खाद्यपदार्थांना आच्छादन म्हणून प्लॅस्टिकचा वापर होतो. आजकाल कॅरी बॅग म्हणून प्लॅस्टिकचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला आहे. एकदा वापर करून फेकून द्यावयाच्या प्लॅस्टिकमुळे प्रदूषण वाढत चालले आहे. या प्लॅस्टिकमुळे शहरातील गटारे तुंबतात. ओढे, नद्या, नाले एवढेच नव्हे तर; समुद्र देखील प्लॅस्टिकच्या लहान-मोठ्या तुकड्यांनी व्यापलेला आहे. प्लॅस्टिक सडत किंवा कुजत नसल्याने ते वर्षानुवर्षेतसेच राहते. त्यामुळे निसर्गातले प्लॅस्टिकचे प्रदूषण वाढतच जात आहे. त्यामुळे आपल्या खाण्याच्या आणि पिण्याच्या पदार्थांत प्लॅस्टिकचे बारीक बारीक कण आढळतात. हे फारच धोक्याचे आहे. ते टाळण्यासाठी प्लॅस्टिकचा वापर कमी करणे आवश्यक आहे. प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे थांबेल असे वाटत नाही. यासाठी प्लॅस्टिकचा पुनर्वापर करण्याचा मार्ग सुचविला जातो. तसेच, इतर नैसर्गिक घटकांप्रमाणे मातीत मिसळून जाईल अशा प्रकारच्या प्लॅस्टिकची निर्मिती करावी

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

असेही सुचविले जाते. या सगळ्या बाबींचा विचार करण्यात येत आहे. त्याचा अवलंब करण्यासाठी समाजजागृती करणे आवश्यक आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हाच प्रयत्न करण्यात येतो.

केवळ जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी पर्यावरणाची काळजी घेऊन यश मिळण्यासारखे नाही. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहण्याची गरज आहे. या संदर्भात विप्रो या कंपनीने पुढाकार घेतला आहे. या संस्थेने 'पृथ्वी पर्यावरण मित्र मंडळ' स्थापन केले आहे. यामध्ये शाळा, तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षक यांचा सहभाग आहे. त्यांच्या मदतीने पर्यावरण रक्षणासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले जातात. नुकतेच त्यांनी पश्चिम बंगालमध्ये एका कृतिसत्राचे आयोजन केले होते. या कृतिसत्रात पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी काय काय करण्याची गरज आहे हे स्पष्ट करण्यात आले. त्याआधारे काम पूर्ण करून त्याचा अहवाल १५ ऑगस्ट पर्यंत संस्थेला सादर करायचा आहे. त्या अहवालांचे मूल्यमापन करून उत्तम अहवालाला पारितोषिक देण्यात येणार आहे. अशा प्रयत्नांची आज देशाला गरज आहे. देशातील विविध स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन प्रयत्न केल्यास पर्यावरण प्रदूषणाची समस्या हाताळणे सहज शक्य होईल.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जगभर वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, प्रभातफेरी, वृक्षारोपण अशा कार्यक्रमांचा यात भरणा असतो. 'पर्यावरण दक्षता मंडळा'ने या दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. ठाणे शहरात 'पर्यावरण दक्षता मंडळ' नावाची एक संस्था मागील अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. पर्यावरणाचे रक्षण कसे करता येईल यासाठी ही संस्था सतत कार्य करीत असते. या संस्थेच्यावतीने ''पर्यावरण आपलं'' या नावाचे एक मासिक चालविण्यात येते. नुकताच या संस्थेने मुरबाड जवळ वनविभागाच्या जागेवर एक चांगले जंगल विकसित केले आहे. त्यांचे हे कार्य पाहून टिटवाळा येथील 'गणेश मंदिर ट्रस्टने' १२ एकर जागा विकसित करण्यासाठी या संस्थेकडे सुपूर्द केली आहे. याच जागेवर रविवार दिनांक ८ जून रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण आणि टिटवाळा या गावांतील निसर्गप्रेमी मंडळी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होती. त्यांतील अनेक सभासदांनी झाड लावून आपला सहभाग नोंदविला.

आपल्या पृथ्वीवर असलेले वृक्षांचे आच्छादन दिवसेंदिवस कमीकमी होत आहे. त्याचे दुष्परिणाम देखील दिसू लागले आहेत. तापमान वाढ, अवेळी होणारी पर्जन्यवृष्टी, हवेचे होणारे प्रदूषण ही आता नित्याचीच बाब झाली आहे. त्यावर इलाज शोधणे आवश्यक आहे. मानवाने आपल्या कृतीने निसर्गाचा समतोल बिघडवला आहे. तो पुनश्च स्थापित करण्याची जबाबदारी मानवाचीच आहे. असे जर झाले नाही, तर एक प्रदूषित पृथ्वी आपण पुढच्या पिढीला सुपूर्द करू. पृथ्वीच्या पर्यावरण कामात नवीन पिढीचा सहभाग वाढविणे देखील आवश्यक आहे. 'टिटवाळा येथे निर्माण होणारी वनराई ही शाळकरी विद्यार्थ्यांसाठी सहलीचे ठिकाण झाले पाहिजे', असे मी माझ्या व्याख्यानात सुचविले होते. आयोजकांनी या सूचनेला अनुकूल प्रतिसाद दिला. 'पर्यावरण दक्षता मंडळ', तसेच तिच्यासारख्या इतर संस्था यांनी या कामी पुढाकार घेण्याची गरज आहे. तसेच, शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थी पर्यावरण रक्षक कसे होतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरच काहीतरी साध्य करता येईल. आपल्या सूर्याभोवती फिरणारे अनेक ग्रह आहेत. परंतु जिथे आपल्याला राहता येईल असा एकच ग्रह आहे तो म्हणजे पृथ्वी. या पृथ्वीची निगा राखणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ६/जून २०२५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | गिरनार दत्तात्रेय पादुका दर्शन... आदेश, आनंद, अनुभव आणि अनुभूती.. | साधना योगेश जोशी | २ |
| ३) | अणुचाचणीच्या स्थलनिवडीची कहाणी | नरेंद्र गोळे | १४ |
| ४) | खगोल-ऋषी - डॉ. जयंत नारळीकर | राजेश कुलकर्णी | १९ |
| ५) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | २३ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गिरनार दत्तात्रेय पादुका दर्शन... आदेश, आनंद, अनुभव आणि अनुभूती..

*श्रद्धा आणि भक्ती या द्वैताचं अद्वैत अर्थातच श्रद्धेचं भक्तिमध्ये परिवर्तन होतानाचे अनुभव या लेख प्रपंचाच्या माध्यमातून तुमच्यासमोर मांडत आहोत. - संपादक*

मी फार श्रद्धाळू आहे असा भाग नाही; पण समजायला लागल्यापासून विश्वाला 'चालवणारी' एक वैश्विक शक्ती आहे आणि तिने हे जग निर्माण केलंय ! if there is a creation then there must be a creator यावर माझा ठाम विश्वास. त्यामुळे त्या निर्मात्यासमोर मी सतत नतमस्तक असते.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की कशासाठी हा ऊहापोह?

तर सुरुवातीला म्हटलं तसं की, माझ्या या विश्वासाचं वा श्रद्धेचं भक्तीत रूपांतर होणारा एक अनुभव आज तुम्हाला सांगायचा आहे.

अनुभवापेक्षा त्याला अनुभूतीच म्हणू या... कारण अंतरबाह्य बदल करण्याची क्षमता त्यात आहे.

मे महिन्याची सुट्टी लागली आणि कुठेतरी बाहेर जाऊ या असा विचार सुरू झाला.

गेली चार-पाच वर्षं, 'मला गिरनार दर्शन करायचेय असा हट्ट मी नवऱ्याकडे करत होते. कारण गिरनार बाबतीत इतरांचे अनेक अनुभव मी सोशल मीडियात ऐकले होते, पाहिले होते.

खरं सांगू ?...बरेचदा ते अतिरंजित वाटायचे; पण तरीही कुठेतरी कुतूहल निर्माण होत होतं. या कुतूहलापोटी हे अनुभव आपल्यालाही अनुभवायला मिळावेत ही एक सुप्त इच्छा मनात निर्माण झाली होती. युट्युब वर, गुगल वर आम्ही सगळी माहिती घेतली होती; पण काहीकेल्या गिरनार वारी काही ठरत नव्हती.

या सुट्ट्यांमध्येसुद्धा पुन्हा ती इच्छा प्रबळ झाली आणि मी नवऱ्याकडे हट्ट धरला. ''पण ट्रेन बुकिंग खूप आधी करावे लागते. आत्ता वेळेवर मिळणे अतिशय कठीण आहे. यासाठी खूप आधीच नियोजन हवे होते.''

इति माझे यजमान.

त्यांचेही बरोबर होतं म्हणा. आयत्या वेळेवर ट्रेन बुकिंग मिळणं कठीण होतं आणि १७ तास सलग बसने प्रवास व्यवहार्य वाटत नव्हता.

पण स्त्री हट्टा पुढे त्यांनी शेवटी,

''आपण आपल्या कारने जाऊ.''

असा सुवर्णमध्य साधला.

परंतु ठाणे ते जुनागड मार्गे गिरनार हे जाऊन-येऊन तब्बल २०००कि.मी.. अंतर आणि यासाठी आमच्याकडे फक्त २ दिवस होते. म्हणजे पोचण्यासाठी सलग १७ तास कार ड्राईव्ह करणे आलेच.

''हरकत नाही, करू या प्रवास''

असा निर्णय जवळपास झाला आणि माझा एक विद्यार्थी.. वेदांत जामगावकर जो नियमित गिरनारला जात-येत असतो तो भेटला......

''मॅडम, कार ड्राईव करत जाऊ शकाल हो, पण गिरनार रोप वे सुरू असला तरीही पुढच्या ५ हजार पायऱ्या चढून आणि उतरून खाली आल्यावर ...लगोलग परत १७ तास ड्राईव्ह करणे कठीण नाही तर अशक्य

आहे!'' आणि पुन्हा गिरनार भेटीचा हा मार्ग पण आम्ही रद्द केला. पुन्हा मन खट्टू झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहज म्हणून नवऱ्याने रेल्वे बुकिंग ॲप उघडले आणि next day ची सौराष्ट्र एक्सप्रेसची जुनागढ साठी तीन AC बर्थ तत्काळमध्ये कन्फर्म मिळाले. इतके दिवस ठरवून जे होत नव्हते ते अचानकपणे २४ तासांवर घडणार होते. थोडक्यात, 'आदेश' आला होता. मग काय 'दत्त दर्शनाला जायचं. आनंद पोटात माझ्या माईना.' अशी मनाची अवस्था!

तयारीसाठी अवघे काही तास होते आणि आमची काहीच तयारी नव्हती....पटपट जमेल तशी बॅग भरली...

दुसऱ्याच दिवशी म्हणजे मंगळवार ६ मे, दुपारी दोन वाजता बोरिवलीला सौराष्ट्र मेलने जुनागडच्या दिशेने आमचा प्रवास सुरू झाला.

कालपर्यंत; कसं जायचं? कसं सगळं जमणार? या विवंचनेत असलेले आम्ही जणू दत्तगुरूंच्या आदेशाने त्यांच्या भेटीला निघालो होतो.

इतक्या पायऱ्या चढ-उतार करायच्या आहेत.... कसं असेल वातावरण ? कारण गिरनारला जाण्याचा सर्वोत्तम काळ हिवाळा किंवा पावसाळा..... मे च्या रणरणीत उन्हात शक्यतो टाळले जाते... कारण सूर्य आग ओकत असतो....

आम्हाला त्रास होईल का? अशा प्रश्नांचे काहूर मनात घेऊन ट्रेन सोबत आमच्या कल्पनांचा वेगही वाढत होता. ट्रेन मधे गप्पा, जेवण करून थोडीशी झोप हवी म्हणून पहाटे चारचा गजर लावलेला. पण त्या आधीच मध्यरात्री ट्रेनचा डबा जागा झाला.....भारताने पाकिस्तान वर हल्ला केलाय...मिशन सिंदूर सुरू झालंय.....ही चर्चा सुरू झाली.

आता आम्ही सौराष्ट्र मध्ये होतो. त्यावेळी हे ऐकल्यानंतर मनाची चलबिचल, नाना शंका-कुशंका, पुढे काय होईल ? ही अनिश्चितता...

सगळे एकदम धावून आले....आणि सगळ्यांची झोप उडाली.

''जुनागड यायला किती वेळ आहे?''

याचे उत्तर

''गाडी एक-दीड तास लेट धावत आहे.''

एक वाक्य मला घाबरवण्यासाठी पुरेसं होतं. ज्याने बोलवलं आहे त्याचाच धावा केला. सरतेशेवटी पावणे-सहाला आम्ही जुनागड स्टेशनवर उतरलो.

प्रवासातच एक गाडी सांगून ठेवली होती ..ती आम्हाला जुनागढ स्टेशनवर घ्यायला आली. परिसरात एक वेगळा तणाव जाणवत होता, वर्दळही फारशी नव्हती. गाडीवाल्याचे नाव होते 'राम'.

माझं चित्त शांत व्हावं म्हणून 'त्या' 'रामानं' या रामाला माझ्यासाठी पाठवलं असावं अशी मनाची समजूत काढली! १५ मिनिटांत ६ ते ७ km अंतर पार करून आम्ही गिरनाच्या पायथ्याशी असलेल्या हॉटेल मंगलम् मध्ये सकाळी साडे-सहा दरम्यान चेक इन केलं.

फ्रेश होऊन नाश्ता झाला आणि सोमनाथ दर्शन करून येण्याचं ठरलं...

आता तुम्ही म्हणाल की, 'गिरनार बद्दल सांगताय, त्यासाठी एवढा तुमचा आटापिटा चाललाय, आणि पायथ्याशी येऊन सोमनाथ कशासाठी?' याचे कारण म्हणजे, मला गुरुवारीच गुरुशिखरावर जाऊन पादुका दर्शन घ्यायच होतं. आज होता बुधवार आणि दुसऱ्या दिवशी गुरुवार आणि योगायोगाने 'मोहिनी एकादशी' सुद्धा होती. हे दोन्ही योग मला साधायचे होते म्हणून

बुधवारी गिरनारला शिखर चढाई न करता गुरुवारी सकाळी जावं असं ठरवलं होते आणि आज इथून ८० ते ९० किलोमीटरवर असलेल्या सोरटी सोमनाथ दर्शनासाठी आम्ही निघालो. गाडी तीच होती पण आता चालक बदलला होता. श्री. कैलेश रावत, साधारण ६० ते ६२ वय..

प्रवासात समजलं की, ते एक गुजराथी माध्यमाची शाळा चालवतात....त्यांचा मोठा मुलगा कॅनडात शिकत आहे, तर दुसरा एमबीए करतोय आणि यांचा स्वभाव गोष्टीवेल्हाळ, माणसाशी बोलायची आवड म्हणून वेळ मिळेल तसे ट्रॅव्हल्स गाडी चालवतात....गुजराती बांधवांच्या या श्रमप्रतिष्ठा, आत्मनिर्भर आणि कष्टाळू वृत्तीबद्दल खरंच मनात कौतुक दाटून आलं.

दोन तासांत आम्ही वेरावळ बंदरापासून जवळ प्रभास पटण ..म्हणजे सोमनाथ इथे आलो. या ठिकाणी कलेचा उत्कृष्ट नमुना असलेले, अतिशय देखणं आणि वैभवशाली असं मंदिर आपल्या समृद्ध संस्कृतीची साक्ष देत दिमाखात उभं आहे. शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक विश्वप्रसिद्ध सोमनाथाचे मंदिर ! अतिशय स्वच्छ परिसर, उत्तम नियोजन, येणाऱ्या भक्तांची काळजी घेण्यासाठी घेतलेली खबरदारी, साऱ्या गोष्टी मनाला मोहित करत होत्या. पण मला सर्वांत जास्त आकर्षून घेतलं ते मंदिराच्या डाव्या बाजूला असलेल्या बाणस्तंभाने!

भारताच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील स्थित या मंदिराच्या डाव्या बाजूला एक दिशादर्शक बाण आहे. ज्यावर 'आसमुद्रान्त दक्षिण ध्रुव पर्यंत आबाधित ज्योतिर्मार्ग' असा श्लोक कोरला आहे.

याचा अर्थ असा की, 'या बिंदूपासून दक्षिण ध्रुवापर्यंत सरळ रेषमार्गात जमिनीचा एकही तुकडा नाही, अडथळा नाही'. ६ व्या शतकाच्या इतिहासात या बाण स्तंभाचा उल्लेख आढळतो, पण त्यापूर्वी तो नेमका कधी स्थापिला याचा अंदाज नाही. आज अत्याधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान, ड्रॉन, उपग्रह वापरून हे विधान सत्य आहे याचा पडताळा आला आहे.

तो स्तंभ पाहून मी अक्षरशः स्तंभित झाले. दीड हजार वर्षांपेक्षा जास्त आधी आपल्या पूर्वजांनी हे लिहून ठेवलंय. या बिंदूपासून थेट दहा हजार किलोमीटर बाणाच्या दिशेने सरळ गेलात तर दक्षिण ध्रुव लागेल आणि मध्ये जमिनीचा एकही तुकडा नाही हे आपल्या पूर्वजांना कसे समजले असेल?

त्यांना पृथ्वीगोल आणि त्याचा दक्षिण ध्रुव अगदी नेमका कुठे आहे हे अचूक माहिती होते आणि तसा सरळ रेषा मार्ग देखील दर्शविला अगदी एक फुटाचा फरक न पडता.... म्हणजेच त्यांची बुद्धिमत्ता त्यांचा अभ्यास किती प्रगल्भ आणि अत्युच्च दर्जाचा होता हे लक्षात येतं.

भूतकाळावर वर्तमानाने अभिमान बाळगत भविष्याला ते ताठ मानेने सांगावं असा तो क्षण होता. समृद्धीशाली ज्ञानाचा वैश्विक वारसा बाळगणारे, मिरवणारे आपण सगळे खरोखर भाग्यवंतच!

त्या मंदिराचे वैभव पाहात असताना मनात विचार आला, आजवर गेल्या अनेक सहस्रकांमध्ये उझबेकिस्तान व अफगाणिस्तानातील आक्रंद मोहम्मद गजनी पासून ते क्रुरकर्मा औरंगजेब बादशाह पर्यंत जवळपास सोळा ते सतरा वेळा या मंदिराला लुटलं गेलं....

जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न केला, सोने नाणे जडजवाहीर लुटले.. अमानुष आणि भयंकर कत्तली केल्या........असे असून या यवनांना या मंदिराचे वैभव कमी करता आलं नाही, की सामान्य भक्तांच्या ह्रदयातील श्रद्धा देखील कमी करता आली नाही........

---

जसे चांगले दिवस राहत नाहीत, तसेच वाईट दिवसही राहणार नाही.

इतक्या वेळा लुटून आक्रमण करून आजही त्याच जागी या मंदिराचे वैभव गर्वाने उभे आहे आणि श्रद्धेने असंख्य हिंदू बांधव येथे नतमस्तक होतात....... पण ज्यांनी लुटून नेले त्यांच्या पिढ्या आता काय करतात?

उझबेगिस्तान असो की अफगाणिस्तान या देशांची आजची अवस्था काय आहे?

नित्सिम श्रद्धा व अतूट भक्ती यांच्या पायावर उभ्या राहिलेल्या भारतीय संस्कृतीचा आपण एक भाग असल्याचा सार्थ अभिमान बाळगत परिसर पाहू लागलो. तो विस्तीर्ण असा समुद्रकिनारा नजरेत साठवत, सोरटी सोमनाथ शिवाला मनोमन वंदन करत आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांना आणि मंदिरांना भेटी दिल्या. ज्यात भालका मंदिर, त्रिवेणी संगम, सूर्य मंदिर, पांडव गुफा, कृष्ण देहोत्सर्ग ठिकाण यांचा समावेश होता.

विशेष भाग्याची गोष्ट म्हणजे, पांडव गुफेच्या शेजारी विस्तीर्ण मैदानात आम्ही गेलो तेव्हा भागवत सप्ताह सुरू होता आणि त्या दिवशी आंतरराष्ट्रीय कथाकार पद्मश्री परमपूज्य रमेश भाई ओझा यांची द्वारकाधीश कथा सुरू होती. या सर्व दर्शनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या भजनांची सुरेख साथ आम्हाला लाभत होती. त्या भक्तीमय वातावरणात भारावलेल्या मन:स्थितीतच दुपारचं जेवण करून आम्ही परत निघालो.

प्लास्टिक मुक्त परिसर व खड्डे मुक्त रस्ते... दुतर्फा भर उन्हाळ्यात देखील हिरवीगार शेती.....मन प्रसन्न करत होती. साधारण तीन, सव्वा-तीन झाले असतील. अचानक आभाळ भरून आलं....आणि -

सोसाट्याचा वारा सुटला.
मुसळधार पाऊस कोसळू लागला.
समोरचं काहीच दिसेना.
गाडीचे वायपर सुद्धा थकले.

तुफान पाऊस बरसला. या वाक्यातील 'तुफान' या शब्दाचा आम्ही शब्दशः अनुभव घेत होतो... प्रवासात भारत-पाक युद्धांच्या बातम्या आणि त्यावर मतमतांतरे सुरू होती..

अर्ध्या एक तासाने पाऊस थांबला. संध्याकाळी साडे-पाच वाजता गिरनारच्या पायथ्याशी असलेल्या आमच्या हॉटेलमध्ये पोहोचलो. नियोजनाप्रमाणे आज सोमनाथ दर्शन खूप चांगलं झालं म्हणून आम्ही खुश होतो.

आता उद्या सकाळचे गिरनार दर्शनाचे नियोजन सुरू झाले. उद्या सकाळी ७ वाजता रोप वे (उडन खटोला) पहिलाच स्लॉट ऑनलाईन बुकिंग आधीच करून ठेवले होते.

सकाळी लवकर जाण्याचा फायदा हाच की, जास्त उन्हाचा त्रास होण्याआधी दर्शन घेऊन खाली उतरता येईल. कारण उन्हाचा वैशाख वणवा पेटला होता, त्या उन्हाचा त्रास होण्याची शक्यता होती.

दर्शन करून लगेच परतीचा प्रवास करावा म्हणून ठाण्याला येण्यासाठी परतीचे दुपारी तीन वाजता स्लीपर कोच ट्रॅव्हल बसचे बुकिंग पण लगेच तिथल्या तिथे करून टाकले....

हुश्श...उद्याचे सारे नियोजन व्यवस्थित पार पडले होते. आम्ही आमच्या पद्धतीने, आमच्या मनाला येईल तसं नियोजन करून ठेवलं. पण शेवटी म्हणतात ना त्याची एक टक्का सोबत लागतेच याची प्रचिती पुढच्या एक तासात आम्हाला येऊ घातली होती....

पुढच्या एका तासात आमच्या सगळ्या नियोजनाला एक वेगळंच वळण मिळणार होतं....

हॉटेलवरून फ्रेश होऊन आम्ही खाली उतरलो. रात्री शेजारच्याच गोरक्षनाथ आश्रमात प्रसादाचे जेवण

करायचं असं ठरलं. त्या जेवणाला काही तास होते. त्यामुळे तेवढा वेळ गिरनार पायथा परिसर फिरण्यासाठी निघालो.....

रस्त्यावर अगदी तुरळक वर्दळ होती, एखाद दुसरे माणूस नजरेत पडत होते, गर्दी नसल्याचे कुतूहल वाटत होते. उद्या सकाळी ज्या रोप वे ने जायचे आहे, त्याचा रस्ता, ते ठिकाण जाऊन आधी पाहून घेऊ या विचाराने.....

रस्त्यावर एकाकडे रोपवे कडे कसे जायचे ? या बद्दल विचारणा केली.

त्यावर त्याने उत्तर दिले,

यहांसे पास में ही है, लेकीन वहां जाकर क्या करोगे? रोप वे तो ४/५ दिनोंसे बंद है।

चार दिवसापासून रोप वे बंद....कसे शक्य आहे?

....परवाच तर आम्ही ऑनलाईन स्लॉट बुक केला होता....

ह्या माणसाला काही माहिती नसावे किंवा मस्करी करत असावा असे वाटून चालत चालत आम्ही रोप वे च्या गेट समोर पोहचलो पण......

सगळीकडे सामसुम ...

ती शांतता असह्य करत होती......

गेट बंद होते... काहीच वर्दळ दिसत नव्हती......

एक क्षणात आमचं सगळं अवसानच गळून गेलं..

नाही म्हणायला एका बाजूला एक सुरक्षारक्षक दिसला. आम्ही काही विचारण्याआधीच तो म्हणाला, ‘मॅडम जी चार दिनोसे मौसम खराब होने के कारण रोप वे बंद है ।’ आम्ही एकदम गोंधळून गेलो...

‘अरे भाई, चार दिनोसे बंद था तो परसो हमे ऑनलाइन बुकिंग क्यूं दिया?

वहां पर यदि ये सूचना या चेतावनी मिल जाती तो हम बुकिंग नहीं करते ।’

खरं तर याचे उत्तर देण्यासाठी तो योग्य जबाबदार माणूस नव्हता हे माहिती असूनही आमचा त्रागा बाहेर पडत होता.

‘मॅडम जी, ऑनलाईन बुकिंग का कोई इश्यू नहीं है, आपके पैसे रिफंड हो जायेंगे ।’ अगदी खात्रीच्या सुरात त्याने उत्तर दिले.

‘भाई, सवाल पैसे रिफंड का नही है। हम ठाणे - मुंबई से केवल दर्शनमात्र हेतुसे गिरनार आये हैं ।

यदि ये पूर्वसूचना हमे परसो ही मिल जाती तो हम ऑनलाईन बुकिंग करते ही नहीं और आज आते ही नहीं ।’

‘मैं आपकी भावना समझ सकता हूं, लेकिन यहां हररोज सुबह ६ बजे इंजिनीयर रोपवे ट्रॉली टेस्टिंग करते हैं, यदि वह टेस्टिंग में ओके ग्रीन सिग्नल देते हैं तभी उस दिन रोप वे शुरू करते है ।

आप इतनी दूर से दर्शन की आस लेकर आए है, मन से दत्तमहाराज की प्रार्थना कीजिए। क्या पता कल टेस्टिंग में ग्रीन सिग्नल मिल भी सकता है ।

नहीं तो आप दस हजार सीढ़ी चढ़कर भी दर्शन कर सकते है । लेकिन इसमें खराब मौसम की चुनौति सबसे ज्यादा तकलीफ देती है ।’

तो नक्की धीर देत होता, की घाबरवत होता हेच समजत नव्हते! पण त्याचे एक वाक्य कानात गुंजत राहिले, दत्तमहाराज की प्रार्थना करो, क्या पता कल टेस्टिंग में ग्रीन सिग्नल मिल भी सकता हैं ।’

---

माझी अगतिकता मी थांबवू शकत नव्हते.

का कुणास ठाऊक.. नकळत डोळे पाणावले....

समोर दिसणारा गिरनार पर्वत अंबाजी माता मंदिर आणि त्याच्याही पलीकडे असणारं गुरुशिखर.. पायथ्यापासून आम्हाला खुणावत होतं. आणि आमच्या मनातील आशा पल्लवीत करण्यासाठी त्याच्या मुखातून जणू दत्तगुरु आम्हाला मार्गदर्शन करत होते.

माझ्या मुलीने म्हणजे वीणाने मोबाईल वर उद्याचे हवामान अंदाज पाहिले..., 'आई उद्या पण रोप वे सुरू होणे कठीण आहे ग, कारण उद्या सुद्धा दुपारी १ पासून विजांसह वादळी पावसाचा अंदाज आहे.'

एकावर एक धक्के आम्हाला मिळत होते, आणि इथे आज गर्दी का नाही याचा उलगडा झाला होता.

१० हजार पायऱ्या तेही इतक्या प्रतिकूल हवामानात चढ-उतार करणे ही कल्पना पण करवत नव्हती.... आमची शारीरिक आणि मानसिक तयारीच नव्हती....

साधं सरळ चालायचा सवय सराव राहिला नव्हता तर पर्वत..पायऱ्या....विचारानेच पाय आणि मन जड झाले होते...

आमची मन:स्थिती आमच्या लेकीने ओळखली.... वीणा म्हणाली, 'असू दे जे असेल ते असेल. आपण पायरी मार्ग कुठे तोही पाहून घेऊ...मी आहे न सोबत...जाऊ या आपण शिखरावर'

असे म्हणून तिने एकाला पायरी मार्ग रस्ता विचारला आणि तिच्या मागे आम्हीही ५ मिनिटांत पायरी मार्गाजवळ आलो.

पहिल्या पायरीला नमस्कार केला. डाव्या हाताला मारूतीराया उभा आहे. त्याला साकडं घातलं. पहिल्या पायरीपासून वरील अकरा पायऱ्यांवर 'कर्पूर पूजा' केली. थोड्या वरच्या बाजूला असलेल्या महादेवाचे दर्शन घेतलं. आणि तिथेच आम्ही तिघेही शांत बसून राहिलो, खूप वेळ कुणीही पायरीवरून वर जाताना दिसलं नाही की कुणी उतरताना भेटलं नाही.

एव्हाना संध्याकाळचे सात, साडे-सात वाजले होते, अंधारून आले होते. आणि अंधारात पायऱ्यांवर दोन आकृत्या दिसल्या. चला कुणाला तरी वर काय परिस्थिती आहे हे विचारता येईल याचा आनंद झाला. ते दोघे मराठी तरुण होते आणि नियमित गिरनारला येणारे होते. खूप दमलेले होते. पहाटे वर चढायला सुरुवात केली होती आणि आता संध्याकाळी ७ च्या सुमारास उतरत होते. 'ताई, वादळ पावसाने खूप परीक्षा पाहिली आमची, खूप वेळ थांबावे लागले. तीन वेळा पूर्ण भिजून अंगावरच कपडे सुकले आमचे; पण आधी अनुभव होता म्हणून पोहचू शकलो, आजवर इतका कठीण अनुभव आला नव्हता...'

ते थकून हळूहळू पायऱ्या उतरणारे तरुण पाहिल्यावर पुन्हा शंका आणि कुशंका यांचे थैमान मनात सुरू झालं. या तरुणांची ही अवस्था आहे तर माझं काय होईल?

पाच हजार पायऱ्यांवर अंबाजी मातेच्या मंदिरानंतर थांबण्यासाठी काहीच आधार नाही. काळा अभेद्य कातळ कडा.. त्यातील अरुंद पायऱ्या. चालायचं, चढायचे, उतरायचं, पुन्हा चढायचं.... खडी चढाई.

जमेल आपल्याला ?? कसं होईल ? काय होईल....? या विचारात असताना ...

आणखी चार-पाच महिला उतरताना भेटल्या. लातूरच्या होत्या.

'काय मावशी झालं का दर्शन?'

'नाय वो ताई'

'का हो?'

'काय सांगू ताई, जीवाचं रान करून आठ हजार पायऱ्या चढलो. दोन-तीनदा मुसळधार पावसात ओल्ली झालो आणि सुकलो बी; पण दोन हजार पायऱ्या शिल्लक असताना माघारी फिरायला लागलं. सोसाट्याचं वारं, वेड्यावाणी पाऊस आणि ढग इतकं उतरलं की दोन हात जवळ असलेलं माणूस दिसंना....पुढ जाताच येत नव्हतं.. आणि थांबाया येळच नव्हता. कारण आम्ही ट्रॅव्हल्स बसने आलोय.. बाकी कुणी वर आलंच नाही सगळ्यांनी पायरीवरूनच दर्शन घेतलं. फक्त आम्ही चौघीच वर आलो होतो...

आता रात्री ८ ला बस निघणार आहे... आमच्यासाठी थोडीच थांबणार व्हती! .. म्हणून तिथूनच नमस्कार करून माघारी फिरलो गं.'

हे सांगताना त्यांचा रडवेला चेहरा माझ्या नजरेतून सुटला नाही. आठ हजार पायऱ्या चढून दर्शन न घेता त्या मागे आलेल्या होत्या. किती वाईट वाटलं असेल!

मनात म्हटलं दत्त महाराज किती ती परीक्षा पाहायची? त्यामुळे मला माझ्या क्षमतेवर पडणारे प्रश्न अधिक गडद झाले... आपली ही अवस्था ह्यापेक्षा निराळी नसणार आहे...

इथे येऊन शिखरावर न पोहचताच परत जायचे....

मनाची घालमेल वाढत होती..

उसन आलेलं अवसान गळून पडत होतं...

थोड्या वेळात आणखी दोन महिला खाली उतरताना दिसल्या, आई आणि मुलीची जोडी होती ती. त्याही दमल्या होत्या, यांचाही अनुभव वेगळा नसणार होता हे माहिती असूनही त्यांना थांबवलं...आणि चौकशी सुरू केली.

''ताई, कसे झाले दर्शन?'' - माझे कुतूहल

'खडतर होते पण पोहचलो आम्ही आणि झाले दर्शन आम्हाला. तोच नेतो आपल्याला.' त्यांच्या अनपेक्षित उत्तराने मला आनंद झाला. दोघी मायलेकी पुण्याच्या होत्या. आई जवळपास माझ्याच वयाची. त्याही सकाळी सातला रोप वे बंद होता म्हणून वर चढल्या होत्या आणि आता संध्याकाळी साडे-सात वाजता खाली उतरत होत्या.

वादळ, वारा, पाऊस, ढग या साऱ्यांचा त्यांनीही सामना केला होता.. एकमेकींचा हात धरून पाऊस वादळ कमी होण्याची वाट बघत एका जागी अर्धा पाऊण तास बसून मग हळूहळू पुढे जात राहिल्या होत्या. त्याही अंगावरच तीन ते चार वेळा चिंब भिजून तशाच वाळल्या सुद्धा होत्या. अत्यंत खडतर प्रतिकूल परिस्थितीत दर्शनाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. त्यामुळे थकवा असूनदेखील जाणवत नव्हता. त्यांनी आम्हाला धीर दिला. 'काही काळजी करू नका सगळा भार दत्त महाराजांवर सोडा.

तुम्ही तर एकमेकांना तिघे सोबत आहात, जाऊ शकाल तुम्ही. अवघड आहे, पण अशक्य नाही.'

त्यांच्याशी बोलल्यानंतर मनानं पुन्हा उभारी घ्यायला सुरुवात केली. ठीक आहे सवय नसली म्हणून काय झालं; प्रयत्न तर करून बघू या, या निर्णयाप्रत यायला लागले.

त्या दोघींचं आमच्या पायाकडे लक्ष गेलं. आमच्या पायातील स्पोर्ट्स शूज कडे पाहून त्या म्हणाल्या, 'हे बूट उद्या चढताना चालणार नाहीत. कारण पाऊस असणारच आहे. बूट भिजले की अजिबात चालता येणार नाही आणि पायाला प्रचंड त्रास होईल. तुम्ही पावसाळी साधी चप्पल किंवा स्लीपर वापरा.'

आम्ही केलेली जय्यत तयारी किती कुचकामी आहे हे आमच्या लक्षात आलं होतं. कारण आम्ही

सोबत सध्या चप्पल, स्लीपर आणल्या नव्हत्या. लागलीच आम्ही पायथ्याशीच असलेल्या एका दुकानातून कशाबशा तिघांसाठी प्लास्टिकच्या चपला विकत घेतल्या.

कारण तिथे खास चप्पल बुटाचं दुकान नव्हते. एक कटलरी सामान दुकानातून ज्या आणि जशा मिळाल्या तशा चप्पल घ्याव्या लागल्या. आता या नवीन चपला पायाला चावतील म्हणून दहा-बारा बँडेजच्या पट्ट्या घेतल्या. मध्ये थकायला झालं तर; म्हणून ग्लुकोजची पावडर घेतली. पाण्याची बाटली घेतली.

उद्याच्या चढाईची अशी एकंदरीत तयारी झाल्यानंतर आम्ही गोरक्षनाथ आश्रमात प्रसादाचे सात्विक जेवण करून रूमवर परतलो.

मनात अखंड विचार. चमत्कार झाल्यासारखा रोपवे चालू होईल का? आपल्याला दहा हजार पायऱ्या चढता येतील का? बरं, चढल्यानंतर त्या उतरता येतील का? फजिती तर नाही होणार ना? उद्या भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर सगळंच बंद झालं तर? ही शक्यता होतीच. ह्या विचारात असताना अचानक काहीतरी आठवल्यासारखे झाले.

एक म्हणजे आमच्या रूमच्या खिडकीतून रोपवे अगदी स्पष्ट दिसत असतानाही सकाळी जेव्हा आम्ही रूमवर आलो.... तेव्हा तो बंद आहे हे कसे लक्षात आले नाही? किंवा खाली उतरल्यावर कुणाला रोपवे बद्दल विचारावे असे का वाटले नाही ?

कारण दत्तगुरूंनी आम्ही सोमनाथ दर्शन अगदी निश्चिंत मनाने करावे, कोणतेही चिंता सोबत बाळगू नये, आमचा मूड दिवसभर आनंदी रहावा याची खबरदारी घेतली असावी! आणि महत्त्वाची दुसरी गोष्ट आठवली ती म्हणजे,-अवघ्या काही तासांपूर्वी आपण उद्या दुपारी तीनच्या बसचं रिझर्वेशन केलं आहे. आता रोप वे बंद आहे म्हणजे संपूर्ण १० हजार पायऱ्या चालत जाव्या लागणार. म्हणजे आम्ही संध्याकाळ शिवाय खाली उतरू शकणार नाही, मग दुपारी तीन वाजताची गाडी मिळू शकणार नाही. आता पैसे वाया जाऊ नयेत म्हणून ते रिझर्वेशन एक दिवस पुढे ढकलायला हवं होतं.

आता रात्रीचे ९ वाजून गेले होते. खरं तर संध्याकाळीच ट्रॅव्हल कंपनीला फोन करायला हवा होता, पण मागच्या दोन-तीन तासांत आम्हाला काही सुचतच नव्हतं. तरीही आम्ही रिझर्वेशन पुढे ढकलण्यासंबंधी कॉल करण्याचा प्रयत्न केला. पण उशीर झाला असल्याने कॉल अटेंड झाला नाही, शेवटी म्हटलं मेसेज ड्रॉप करून ठेवू या. त्यांनी री शेड्युल केलं तर ठीक; नाहीतर सोडून देऊ, पैसे वाया गेले असे समजू या.

असा विचार करून दुपारचे तीन चे रिझर्वेशन रद्द करून दुसऱ्या दिवशी तीन वाजता करण्यासाठी विनंती मेसेज आम्ही ट्रॅव्हल ऑपरेटरला करून आम्ही दत्त महाराजांना प्रार्थना करून बिछान्यावर पडलो.

मनात विचार हेच. काहीही झालं तरी उद्या गिरनार शिखर चढायचेच. हवामान कसेही असो. कितीही त्रास होवो.

अहो...

वैराग्याचं प्रतीक असणारा तो ...

कदाचित सांसारिक आसक्ती पासून आम्ही किती विरक्त होतोय याचीच परीक्षा पाहात असावा! मनात म्हणत असावा, 'मला भेटणं एवढं सोपं नाही.'

'सुखाचा, मोहाचा त्याग हीच माझ्या भक्तीची पहिली पायरी आहे.' विरक्तीचा हा नाथपंथीय नियम दत्तगुरू आम्हाला कदाचित अशा पद्धतीने समजावून सांगत होते. बऱ्याच प्रयत्नानंतर खूप उशिरा कधीतरी डोळा लागला.

पहाटे साडे-चारलाच जाग आली आणि खिडकीतून रोपवेकडे पाहण्याचा माझा चाळा सुरू झाला. त्या वॉचमनच्या म्हणण्यानुसार रोज सकाळी सहा वाजता टेस्टिंग घेतले जाते. सुरुवातीला काळोख असल्यामुळे काहीच दिसत नव्हतं. सव्वा-सहाला मात्र तिथे रोप वे ट्रॉलीची हालचाल दिसू लागली.

दत्त महाराजांचा धावा करत... सारे ठीक असू दे.... ग्रीन सिग्नल मिळू दे... हा धावा करत उत्साही मनाने आमच्या हालचालींना वेग आला.

अतिशय उत्सुकतेने जणू काही दत्तगुरुंनी आमचं ऐकले की नाही याची परीक्षा घेण्यासाठी पावणे-सात वाजता आम्ही रोपवे प्रवेशद्वारावर हजर झालो होतो...

खरोखरच रोपवे सुरू झाला होता. आम्हीच पहिले गेलो होतो. आमची तिकीटं पहात, सोबत जर प्लास्टिक असेल तर ते काढून घेत आम्ही पुढे जाऊ लागलो.

सर्व पायऱ्या चालत जाव्या लागतील या १२ ते १४ तासांच्या प्रवासासाठी म्हणून भरलेली बॅग चांगलीच जड होती.

रोपवेच्या ट्रॉलीत बसल्यानंतर झालेलं समाधान आणि दत्तगुरू बद्दलची कृतज्ञता आता मला शब्दात व्यक्त करता येणार नाही. निघण्यापूर्वी तेथील प्रशासनाने आम्हाला सूचना दिल्या, – 'रोपवे कोणतीही पूर्वसूचना न देता कधीही बंद होऊ शकतो. त्यामुळे रिटर्न तिकिटाचे पैसे परत दिले जाणार नाहीत.

पुढे पाच हजार पायऱ्यांवर गुरुशिखरावर महाराजांच्या पादुका आहेत, मात्र तिथे जाण्यात वेळ घालवू नका.

रोपवेने उतरल्यानंतर जवळच अंबाजी मातेचे मंदिर आहे तिथे दर्शन घेऊन लगेच परत या कारण रोपवे बंद करावा लागला तर तुम्हाला चालत यावं लागेल. परतीच्या प्रवासाची खात्री आम्ही देऊ शकत नाही.' त्यांच्या सूचना फक्त कानापर्यंतच पोहोचत होत्या. त्या मनापर्यंत गेल्याच नाहीत! मन तर गुरुशिखरावर पोहोचले होते. आशिया खंडातील सर्वांत लांब रोपवे अशी ख्याती असलेल्या रोपवे ट्रॉलीतून प्रवास सुरू झाला. गिरच्या जंगलाचं सुखद दर्शन घेत, मध्येच काळवीट, सांबर यांना पाहात, असंख्य मोरांचे दर्शन घेत, त्यांची केकावली ऐकत साडे-सात वाजता आम्ही अंबाजी माताजी मंदिराजवळ उतरलो.

देवी पार्वतीने अंबेच्या रूपात इथे निवास केला होता. अतिशय सुंदर असं मंदिर आहे इथे. इथून आता ५ हजार पायऱ्यांची खडी चढाई सुरू होणार होती.

एक शिखर उतरून पुन्हा एक शिखर चढाई करून गोरखनाथांच्या मंदिराजवळ पोहोचलो. गोरखनाथांच्या तपश्चर्येने पावन झालेलं हे या डोंगर रांगेतील सर्वांत उंच शिखर. उतरल्यापासून कुठेही न थांबता सलगपणे झपाझप पायऱ्या चढत-उतरत आम्ही या सर्वोच्च शिखरावर पोहोचलो.



श्वास चांगलाच फुलला होता. आजूबाजूला खाली पाहिले तर पांढऱ्या शुभ्र ढगांशिवाय काहीच दिसत नव्हते. अतिशय विहंगम असे दृश्य होते. गोरक्षनाथांना

नमस्कार केला. समोर गुरुशिखर दिसत होते. आम्ही उभे होतो या शिखरापेक्षा गुरुशिखराची उंची थोडी कमी आहे. त्याची एक सुंदर आख्यायिका सांगितली जाते. सरळसोट कातळ सुळकावर गुरुशिखर दिसत होते, परंतु तिथे जायला पायऱ्या मात्र नजरेत पडत नव्हत्या.

त्या शिखरापासून काही शे पायऱ्या सरळसोट खाली उतरलो आणि नंतर मग गुरुशिखरावर जायच्या पायऱ्या नजरेस दिसू लागल्या. खालच्या टप्प्यावर श्री गुरुदत्तात्रेय पादुका दर्शन नावाची कमान दिसली. आणि आपण आता आपल्या ध्येयाच्या अगदी समीप आलो याचा आनंद झाला. बाजूलाच कमांडलू तीर्थ.

परंतु गुरुशिखराचे दर्शन घेऊन पुन्हा खाली इथे येऊन प्रसाद घेण्याचा रिवाज असल्याने कमांडलो तीर्थाकडे न वळता आम्ही सलग गुरुशिखराच्या खड्या पायऱ्या चढायला सुरुवात केली. खूप दमछाक होत होती. परंतु विश्रांतीसाठी थांबायला मन तयार नव्हतं. हवामानाचा काहीही भरोसा देता येत नव्हता. काल संध्याकाळी आठ हजार पायऱ्यां वरून परत फिरणाऱ्या महिला भक्तांचे चेहरे डोळ्यांसमोर आले, आणि श्वास फुलला तरी न थांबता हळूहळू का होईना एक एक पायरी पुढे चढत गुरुशिखराच्या माथ्याजवळ अगदी समीप आलो. अगदी तुरळक लोक मागे-पुढे होते, म्हणजे दर्शन अगदी निवांत घेता येणार होते.

आमची वीणा गुरुशिखरावर पोहोचली देखील होती. 'आई बाबा लवकर या, अगदी थोडं राहिले आहे', गार वाऱ्यासोबत तिने मारलेली हाक अंग शहरून गेली. पायात बळ एकवटलं. खोल श्वास भरून घेतला आणि न थांबता एक एक पायरी पुढे जात होतो.

गुरुशिखरावर पोहोचलो...... मंदिरात पोहोचताच... संपूर्ण शरणागत भावाने कितीतरी वेळ पादुकांसमोर बसून राहिले...

डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहत होते.... याच साठी केला होता अट्टहास.......... थोड्या वेळाने भानावर आले... दत्तगुरुंना अर्पण करण्यासाठी म्हणून खास आमच्या घरचे आंबे आणले होते, ते अर्पण केले.... प्रदक्षिणा घालून बाहेर पडले.... श्री गुरुदत्तात्रेयांच्या तपश्चर्येच्या अलौकिक तरंग लहरी आपल्याच आपल्याला नक्की जाणवतात......थोडा वेळ विश्रांती घेऊन हळूहळू खाली उतरायचा प्रवास सुरू केला.

इथे नक्की एक अनुभव सर्वांना आला असेल किंवा तुम्ही नक्की घ्याल. जेव्हा डोळे मिटून पादुकांसमोर नतमस्तक होतो तेव्हा मन निर्विकार होते, तुम्ही काहीही ठरवलं असेल तरी काहीही मागण्या काहीही याचना, प्रार्थना मनात येत नाहीत.

श्रीपाद वल्लभ श्री दत्तगुरु अनंत कोटी ब्रह्मांडनायक जरी असले, तरीही ते योगी, विरागी, निर्मोही, स्थितप्रज्ञ, वैराग्याचं प्रतीक असल्याने; धनसंपदा, ऐश्वर्य, सुबत्ता यापेक्षा आध्यात्मिक मन:शांती इथे लाभते, त्याचा अनुभव अन्यत्र कुठे येणे शक्य नाही......



खाली उतरताना नंतर घड्याळ पाहिले, वेळ पाहिली आणि आश्चर्याला आणि आनंदाला पारावर राहिला

नाही.... कारण सकाळी साडे-आठ वाजता दर्शन घेऊन आम्ही खाली उतरायला सुरुवात केली होती.....

काल रात्रीची माझी मनोवस्था..... दर्शन होणार की नाही ही साशंकता...

१२ तास की १६ तास चालावे लागेल हा हिशोब. आणि आज मात्र सकाळी ७ वाजता निघून ८.३० दर्शन घेऊन उतरायला सुरुवात.......

काय आणि कसे स्पष्टीकरण देणार आपण?

तीनशे पायऱ्या खाली उतरल्यानंतर कमंडलू तीर्थावर जाऊन दर्शन घेतले... दर सोमवारी तिथे स्वयंभू धुनी प्रज्वलित होत असते.... तिथे अव्याहतपणे महाप्रसाद सुरू असतो. प्रसाद म्हणजे गरमागरम जेवण! पोळी, भाजी, वरण भात, गोडाचा पदार्थ ......

दहा हजार पायऱ्या चढून तुम्ही वर येता त्या कोणत्याही वेळी ही महाप्रसादाची सिद्धता तुमच्यासाठी तयार असते, काय म्हणणार आपण याला....! मती गुंग होणे हाच अनुभव.

दत्तगुरूंच्या आशीर्वादाने इतक्या उंचीवर त्या कातळात गंगा अवतरली आहे. हे अमृत कुंड म्हणजे एक चमत्कारच म्हणायला हवा. इतक्या उंचीवर काळ्या कातळात मधुर जल हे भक्तांची तृष्णाच नव्हे तर तन मन शांत करत असते.

भक्तीत किती शक्ती असते याची प्रचिती त्यावेळी मात्र नक्की आली. धुकं, वारं आणि ते तुषार अंगावर घेत अतिशय आल्हाददायक वातावरणात खाली उतरू लागलो.

महिना मे, वैशाख वणवा रणरणत असताना आम्ही मात्र थंडगार ढगांच्या पुंजक्यातून खाली उतरत होतो.

एक मात्र खरं की, उतरताना गुडघ्यावर जास्त ताण येतो आणि पाय थरथरू लागतात. आम्ही उतरत असताना आता वर जाणारे भक्त भेटत होते.

कुणी रात्री निघाले होते, कुणी रोपवे ने आले होते. आम्ही सोबत घेतलेल्या लिमलेटच्या गोळ्या, चॉकलेट, खाऊ आणि पोलो गोळ्या आमची वीणा अगदी आवडीने जाणाऱ्यांना देत होती.

आणि, 'थोडेच राहिले आहे..... लवकरच पोहोचाल...' म्हणत त्यांचा उत्साह वाढवत होती...

उतरता उतरता ८ हजार पायरी टप्पा आला.... आणि काल इथले वातावरण कसे असेल याची कल्पना आली....

अनेक बूटस्, भिजलेल्या बॅगा लोकांनी कालच्या वादळात तिथेच सोडलेल्या दिसल्या....

खरंच 'त्याने' बोलल्याशिवाय तुम्ही तिथे पोहचत नाही हेच खरे.

गोळ्या, खाऊ वाटून आता आमची बॅग बऱ्यापैकी रिकामी झाली होती, पण मन भक्तिभावाने ओतप्रोत ओसंडून वाहात होते. त्याच आनंद लहरींवर स्वार होत आम्ही जिथून चढायला सुरुवात केली त्या अंबाजी मंदिराजवळ आलो, दर्शन घेतले.

गिरनारच्या तिन्ही शिखरांचे पुनश्च एकदा मनोभावे दर्शन घेतले आणि उतरण्यासाठी रोपवे मध्ये आलो.

निघताना रोपवे प्रशासनानं दिलेल्या सूचना निदान आमच्यासाठी तरी वाऱ्यावर विरून गेल्या होत्या. कारण रोपवे सुरूच होता... आम्हाला सुखरूप आणि आरामात खाली परत नेण्यासाठी....

सव्वा-दहा वाजता आम्ही खाली पायथ्याजवळ उतरलो..... तसेच लगोलग.. काल संध्याकाळी ज्या पायरी मार्गावर कर्पूरपूजन केले तिथे गेलो, त्याच पहिल्या

पायरीला वंदन केले, मारुतीरायाला नमस्कार करून त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली....

तेवढ्याच ट्रॅव्हल्सचा फोन आला... कारण शिखरावर नेटवर्क नव्हतं, आणि त्याबद्दल आम्ही पूर्ण विसरून गेलो होतो.

ट्रॅव्हल ऑपरेटर आम्हाला सांगत होता, तुमची रिझर्वेशन पुढे ढकलण्याची विनंती आम्हाला मिळाली, परंतु माफ करा, तुमचं आजचं दुपारचं रिझर्वेशन आम्ही पुढे ढकलू शकत नाही.

मी आनंदात म्हणालो, 'झाले ते चांगलेच झाले, रद्द केले नाही ते योग्यच झाले आम्ही आजच प्रवास करीत आहोत'. आणि पुन्हा गुरुदेव दत्तात्रय महाराजांना नमस्कार केला, म्हटले, 'किती काळजी घ्याल महाराज, काय तुमची लीला वर्णावी!'

विचार केला... समजा यांनी आपली विनंती मान्य करून रिझर्वेशन उद्यावर ढकलले असते तर?....

कारण नसताना पूर्ण दीड दिवस हॉटेलवर थांबायला लागले असते.. वीणाचा क्लास चुकला असता..... साडे-दहा वाजता आम्ही आमच्या रूमवर परत आलो.

विश्वास बसणे अवघड होते; सकाळी ७ वाजता निघालो काय आणि गुरुशिखर दर्शन महाप्रसाद घेऊन साडे-दहा वाजता पुन्हा रूमवर परत येतो काय!... सारे सारे जणू स्वप्नवत भासत होते.

खिडकीतून गिरनार शिखराकडे पाहिलं.... पाहता पाहता आभाळ भरून आलं......

वेधशाळेच्या अंदाजाच्या दोन तास आधीच वारा आणि पावसाला सुरुवात झाली.....आणि पुढच्या १५ मिनिटांत रोपवे बंद झाला !...

मी स्वतःलाच चिमटा काढून पाहिला... हे स्वप्न तर नाही?...

अहो, एका तरी अनुभवाची प्रचिती मिळावी याकरिता आलेल्या मला, पावलापावला दर क्षणाक्षणाला त्याची साक्ष मिळाली होती. म्हणजे दत्तगुरुंनी केवळ आमच्यासाठीच काही काळापुरता तो रोपे सुरू केला होता की काय? अशी शंका माझ्यासारख्या एखादीच्या मनात येणे किती स्वाभाविक आहे ना!

आदेश, आनंद, अनुभव आणि अनुभूती हे सगळं सोबत घेऊन दत्तगुरूंच्या आशीर्वादाने दुपारी ३ वाजता ट्रॅव्हल्सने आम्ही ठाण्यात सुखरूप पोहोचलो. घरी पोहोचल्यानंतर टीव्हीवर बातमी पाहिली की गुजरातच्या काही जिल्ह्यांवर पाकिस्तानने काही ठिकाणी ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला आहे..

'देव आहे किंवा नाही ... कुणी पाहिले देवाला?

शेंदराच्या दगडाचा .... उभा आधार गावाला!'

साहेबराव ठाणगे यांच्या ओळी सारख्या मनात येत होत्या. खरोखर या अनुभवातून मी 'तो' देव पाहिला.

शेवटी असे अनुभवच माणसाला समृद्ध करत असतात. एखाद्या श्रद्धेवरचा दृढ विश्वास आणखी निश्चल करत असतात. दत्तगुरूंच्या मनात आलं आणि अडीच दिवसात आम्ही जाऊन सुखरूप परतही आलो.

आता मनाची अवस्था, आनंद पोटात माझ्या मायीना अशी झाली आहे. म्हणून हा आनंद या लेख प्रपंचाच्या माध्यमातून तुमच्यासमोर मांडत आहोत.

गुरुदेव दत्त। जय गिरनारी।।

**– साधना योगेश जोशी**

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

---

सौंदर्य हे वस्तूत नसते; पाहणाऱ्याच्या दृष्टीत असते!...

# अणुचाचणीच्या स्थलनिवडीची कहाणी

*पोखरण-२ करता स्थानाची निवड केली त्याचा, निवडप्रक्रियेकरता नियुक्त केलेल्या चमूतील आघाडीच्या सदस्याने लिहिलेला, प्रथम पुरुषी एकवचनी अहवाल. - संपादक*

भारताची प्रथम अणुचाचणी १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे करण्यात आली. सरकारने तिला 'शांततापूर्ण अणुचाचणी स्फोट' म्हटले. पुढे सामान्यतः ती पोखरण-१ अणुचाचणी म्हणूनच ओळखली जाऊ लागली. मधे ७-८ वर्षांचा काळ गेल्यावर १९८१-८२ मध्ये पोखरण-२ अणुचाचणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पोखरण-१ पश्चात, चाचणीकरता खड्डा खोदण्याचे काम जोधपूरच्या लष्करी शिबिरातील इंजिनीअरिंग रेजिमेंटला सुपूर्त करण्यात आले. ११३-इंजिनीअरिंग रेजिमेंट नावाची ही रेजिमेंट १९६७ साली निर्माण करण्यात आलेली होती. या रेजिमेंटची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि शौर्य यांचा हेवा वाटावा असा इतिहास होता. १९७९ च्या उत्तरार्धात ती जोधपुरात आलेली होती. दिवंगत लेफ्टनंट कर्नल के.सी. धिंग्रा (पुढे जाऊन हे मेजर जनरल पदापर्यंत पोहोचले होते) तिचे नेतृत्व करत होते. जानेवारी १९८१ मध्ये त्यांना निकडीच्या चर्चेसाठी दिल्लीत बोलावून घेण्यात आले. ते जोधपूरला परतल्यावर, सीमाभागातील कार्यकारी टेहळणीकरता मला त्यांच्या सोबत येण्यास सांगितले. आम्ही दोन जोंगा वाहनांतून निघालो. पहिले वाहन ते स्वतःच चालवत होते. बाजूला मी बसलेलो. सोबतचे लोक दुसऱ्या वाहनात होते. वाटेत ते म्हणाले की, 'रेजिमेंटला १२ फूट व्यासाची आणि ५०० फूटहून अधिक खोलीची विहीर खणायला सांगितले गेले आहे.'



आम्हा दोघांनाही तिचा उद्देश चांगल्या प्रकारे कळलेला होता, मात्र आण्विक वा अणुचाचणी हे शब्द मात्र कधीही उच्चारले गेले नाहीत. वस्तुतः या संपूर्ण कामाच्या दरम्यान तसे वर्गीकरण कुणीही केले नाही.

आम्हाला अंतरातून माहीत होते की, हे काम अवघडच आहे. मात्र त्या आव्हानाचा आवाका आणि आकार आकळला नव्हता. आम्ही नागरी अभियंते होतो आणि खणिकर्म अभियांत्रिकीबाबत आम्हाला फारच थोडी कल्पना होती. वस्तुतः आम्ही कधीही खाणीस भेट दिलेली नव्हती किंवा तसली विहीर बघितलेलीही नव्हती.

इथे अशी विहीर खोदण्याबाबत काही माहिती देणे सयुक्तिक ठरेल. भूमिगत खनिजस्तरापर्यंत पोहोचण्याकरता एक उभी विहीर जमिनीच्या पृष्ठभागापासून तर खनिजक्षेत्रापावेतो खणलेली असते. तिच्यातूनच

माणसांची, सामानाची आणि उपस्करांची ने-आण केली जात असते. निष्कर्षित खनिजही तिच्यावाटेच जमिनीच्या पृष्ठभागाबाहेर काढले जात असते. खनिकर्माबाबतच्या सर्व साहित्यांत अशी विहीर खोदणे सर्वाधिक धोकादायक आणि हानीकारक कर्तव्य मानले जात असते. त्यात विशेष तज्ज्ञता आणि विशेष उपस्करांची आवश्यकता असते.

आमच्या कामाबाबत सांगायचे तर, स्थाननिवडीचे काम रेजिमेंटवर सोपवलेले होते. पोखरण भागाचे नकाशे आमच्या हातात होते. पुढील दोन दिवसांत, जागेच्या विस्ताराची कल्पना यावी म्हणून, त्या पल्ल्यांत आम्ही अनेकदा फिरलेलो होतो. आम्ही नऊ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळ निश्चित केले, जे महामार्गांपासून आणि गावांपासूनही दूर होते. सुरक्षा आणि गोपनीयतेबाबतच्या आमच्या गरजा त्यामुळे भागत होत्या.

जोधपूरला परतल्यावर कर्नल धिंग्रांनी नवी दिल्लीतील अधिकाऱ्यांना आमच्या स्थाननिवडीची कल्पना दिली. तिकडून मंजुरी मिळताच, मला पोखरणला जाऊन प्रत्यक्ष जागेची निवड करण्यास सांगण्यात आले. कॅप्टन एन.पी.एस. चौहान आणि कॅप्टन डी.के.राजपूत आणि वीस जवानांची फौज माझ्यासोबत होती. सूर्यास्ताला आम्ही त्या ठिकाणी जाऊन पोहोचलो. निवडलेल्या नेमक्या ठिकाणी पोहोचू न शकल्याने आम्ही रात्री तेथेच मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. खेतोलाई-लोहार्की दरम्यानच्या बैलगाडीच्या वाटेवरील ती एक सपाट जागा होती. एक १८० पौंडाचा तंबू तीन अधिकाऱ्यांकरता लगेचच उभारला गेला. जवान मात्र ३-टन वाहनातच झोपले.

डोळे मिटण्यापूर्वी दुसऱ्या दिवशीच्या कृतीबाबत आम्ही मिणमिणत्या कंदीलाच्या प्रकाशात चर्चा करत होतो. तेवढ्यात कॅप्टन राजपूत ओरडले ‘साप’. आम्ही खाली पाहिले. त्या जागी अनेक साप आणि विंचू सरपटतांना पाहून आमची भीतीने गाळणच उडाली. फुरसं होती ती. हे उघडच होते की, आम्ही त्यांच्या घरात शिरलेलो होतो. शूरवीराच्या काळजातही धडकी भरवणारे दृश्य होते ते. रात्रभर आम्ही आपापल्या कॅम्पकॉटांवरून उतरण्याचे धाडस केले नाही. लघुशंकेचा दाब वाढला तरीही नाही.

दुसऱ्या दिवशी पहिले काम आम्ही कुठले केले असेल तर ते पर्यायी शिबिर थाटण्याचे. मात्र संपूर्ण कामादरम्यानच आम्हाला या फुरशांचाच सामना करावा लागणार आहे याची मात्र आम्हाला तेव्हा कल्पना आलेली नव्हती.

फुरसं हा एक सर्वात धोकादायक साप असतो. अन्य सर्व सापांमुळे होणाऱ्या जीवहानीहूनही फुरशांमुळे होणारी जीवहानी जास्त असते. ते सूप्तपणे वावरत असल्याने, स्थानिक लोक त्यांना कुजबुजत्या आवाजात ‘चोर’ म्हणतात. आमच्याकडेही सर्पदंशाची अनेक प्रकरणे झाली. मात्र सर्व बाधितांना आमच्या कॅप्टन व्ही.के.शुक्ला या रेजिमेंटल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वेळीच सर्पविषविरोधी इंजेक्शन देऊन वाचवलेले होते.

स्थाननिवडीकरता संपूर्ण नऊ वर्ग किलोमीटरचा भाग आम्ही अनेकदा पालथा घातला. पण उपयोग झाला नाही. आम्हाला माहीत होते की, स्थान हे वाळूच्या टेकड्यांमधील सपाट जागीच हवे आहे, फारसे वाळूचे ढिगारे नको आहेत, शिबिराकरता पुरेशी सपाटी हवी आहे. पोखरण-१ च्या वेळी भूजलस्रोतांमुळे अनेकदा आम्हाला माघार घ्यावी लागलेली होती. भूजलस्रोतांचा आढळ कमीतकमी असेल असे ठिकाण हवे होते. मात्र असे ठिकाण कसे शोधायचे याची मात्र आम्हाला काहीच कल्पना नव्हती.

आम्ही खेतोली आणि लोहार्की गावातील

स्थानिकांना भेटायचे ठरवले. भूजलस्रोतांच्या आढळाबाबतचे त्यांचे ज्ञान आम्हाला हवे होते. आम्ही त्यांना सांगितले की, आम्हाला तिथे एक कायमस्वरूपी शिबिर उभारायचे आहे. भूजलस्रोतांचा आढळ असेल असे ठिकाण हवे आहे. ते मदतीस तत्पर होते. त्यांनी पाण्याकरता प्रयत्न करून सोडून दिलेल्या अनेक जागा आम्हाला दाखवल्या. आम्हाला ती ठिकाणे टाळायला सांगितली. 'बोराची झाडे पाहा, मुंग्यांची वारुळे पाहा, तशा ठिकाणी सामान्यतः जमिनीतील पाणी मिळू शकेल', ते म्हणाले.

दुसऱ्या दिवस अखेर, आमची काहीच प्रगती झालेली नव्हती. मात्र आज सरपटणारे सोबती नसल्याने रात्र शांततेत गेली. तिसरे दिवशी सकाळी, आम्ही सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड आणि राजस्थान ग्राऊंड वॉटर खात्यातील तज्ज्ञांचा सल्ला घेण्याकरता जैसलमेर आणि पोखरण शहरांना भेटी दिल्या. भूजलप्रवाह नकाशांचे आधारे त्यांनी पोखरण क्षेत्राचे स्पष्टीकरण दिले. पोखरण निम्न जुराझिक लाठी संरचनेचा भाग असल्याचे सांगितले. तळाशी वर येणाऱ्या ग्रॅनाईटच्या खडकांनी ते व्याप्त होते. त्यात मध्यम ते ठळक दाण्यांचे वालुकाश्म होते, पातळ खडक होते आणि मिश्र राशीही होत्या.

मुख्य पाणीधारक खडक संरचना अनिर्बंधित अथवा बंदिस्त असू शकतात. हवामानाने झिजलेल्या खडकांच्या फटींत असू शकतात. अभेद्य ग्रॅनाईटच्या १२०० फूट खोलातील स्तरांतही असू शकतात. प्रादेशिक भूजलस्तराच्या वरील भागांतही असू शकतात. मात्र आम्हाला ५०० फुटांपर्यंतच जायचे असल्याने आम्हाला या माहितीचा फारसा उपयोग नव्हता.

मग आम्ही सेंट्रल ॲरीड झोन रिसर्च इन्स्टिट्यूट जोधपूर येथेही जाण्याचा निर्णय घेतला. मात्र भूजलस्तराच्या वरील भागांचे आणि भूजलप्रवाहांचे भाकीत करणे अशक्यप्राय असल्याचे त्यांनी सांगितल्याने आमची निराशाच झाली. त्यांनी भूगर्भशास्त्रीय आणि क्षेत्रीय माहिती पुरवली. आम्ही त्यांची माहिती तपशीलाने अभ्यासली पण, निर्णयकारक निष्कर्षांप्रत पोहोचता आले नाही. खणनकार्य सुरू करण्यासाठी स्थलनिश्चिती करणे कठीणच भासत होते. नवी दिल्लीकडूनचा दबाव वाढतच होता. कर्नल धिंग्रांनी स्थलनिश्चिती सत्त्वर व्हावी म्हणून, आम्हाला पुन्हा पोखरणला भेट देण्यास सांगितले.

निरनिराळ्या मार्गांनी मिळालेल्या माहितीसहित आम्ही पुन्हा तपशीलवार शोध घेतला आणि (अ, ब, क आणि ड) अशी चार ठिकाणे निवडून काढली. त्यांचे आपापसांतील अंतर ९०० ते १४०० मीटर होते. वालुका टेकड्यांच्या मधला कडक पृष्ठभागाचा तो सपाट भाग होता. उपस्कर आणि अन्य पायाभूत सुविधा उभारण्याकरता पुरेशी जागा होती. वाळूच्या टेकड्या जवळच असणे गरजेचे होते कारण उकरलेली माती दडपायला त्या उपयोगी ठरणार होत्या. एरवी निरीक्षक उपग्रहांच्या नजरेतून आमची हालचाल सुटली नसती.

आम्ही मग गावकऱ्यांना निश्चित केलेल्या ठिकाणांवर पाणी आढळण्याबाबत पुन्हा एकदा विचारले. हितचिंतक ज्येष्ठ गावकऱ्यांनी स्थानिक पानाड्यांची मदत घेण्याचा सल्ला दिला.

भूजलाचा जमिनीवरून शोध घेणाऱ्यांचा उपयोग, सिनाईच्या वाळवंटात ख्रिस्तपूर्व १२५० वर्षे इतक्या आधी मोझेसने केलेला होता. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रातील विचलने भूजल अस्तित्व प्रदर्शित करतात या समजुतीवर हे आधारलेले होते. पानाड्याचे शरीर विद्युत वाहक ठरते. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रातून चालतांना ते छोटी विभवांतरे निर्माण करते.

काही पानाडे गुल्लेरच्या आकाराच्या काड्याच वापरत. इतर काही एल आकाराच्या लोखंडी सळया

वापरत. हातातील त्यांच्या हालचालींवरून ते भाकीत करत असत. ही पद्धत पूर्णतः संवेदनावरच आधारलेली आहे. पानाडे पाण्याची खोली, साठ्याचे प्रमाण यांबाबत किंवा ते असण्याबाबत वा नसण्याबाबतही कोणतीच शाश्वती देऊ शकत नाहीत. आम्हाला ही कल्पना सुरस वाटली; मात्र अवैज्ञानिक म्हणून आम्ही ती सोडून दिली.

नंतरच्या दिवशी संध्याकाळी आम्हाला न सांगताच खेतोलाई गावातील प्रमुख, पोखरण शहरातून एका पानाड्याला घेऊन आला आणि त्याला त्याने निवडलेल्या ठिकाणांवर शोध घेण्यास सांगितले. ती पौर्णिमेची रात्र होती. नुकतीच तोडून आणलेली गुल्लेराकृती बोराच्या झाडाची काडी आपल्या पिशवीतून काढून, पाण्याने धुवून मंत्र पुटपुटले. आम्हा सगळ्यांकरता तो अनुभव भारून टाकणाराच होता. तरीही ही चारही ठिकाणे पाण्याकरता उपयोगाची नाहीत असे त्याने सांगताच आम्ही सगळ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. कोणत्याही वैज्ञानिक आधाराविना अपेक्षित उत्तर मिळाल्याने समाधान वाटून आम्ही सुखावलो. अणुचाचणीकरता पानाड्याचे प्रमाणही कामी आले हे सांगणे असंबद्ध वाटते! खरोखरीच एक अप्रशस्त प्रमाण होते ते.

पोखरण-१ च्या वेळेला खोदकाम सुरू झाल्यानंतर तीन महिन्यांतच त्यात पाणी शिरल्याने ती विहीर सोडून द्यावी लागलेली होती आणि कोरडी म्हणून सोडून दिलेली एक विहीरच चाचणीकरता तयार करावी लागलेली होती. पोखरण-२ करता प्रस्तावित विहीर किमान ५०० फूट खोल असणे अपेक्षित होते. कोणतीही सोडून दिलेली विहीर इतकी खोल असणार नव्हती, कारण त्या १२० फूटांहून जास्त खोल क्वचितच असत. अनपेक्षित अडचणी गृहित धरून, अधिकाऱ्यांनी एकाच वेळी दोन ठिकाणी विहिरी खोदायचा निर्णय घेतला. त्यामुळे निवडलेल्या चार ठिकाणांपैकी दोन जागा आम्ही निवडल्या. त्याकरता खूप विचार केला तरीही शंका येतच राहिल्या.

गोपनीयता राहील का ही भीती असूनही कर्नल धिंग्रा यांनी, स्थानिक भूजलप्रवाह अडतींचा विहिरीस पाणी लागण्याबाबतच्या अनुभवाविषयी सल्ला घेण्याचे ठरवले. अडतीलाही तीच कहाणी ऐकवली गेली की, लष्कराला भूजलस्रोतासहितची जागा कायमस्वरूपी शिबिराकरता हवी आहे. नमुन्यांकरता अडतीने भूगर्भविंधन केले. १५० फुटांपर्यंतचे नमुने ते काढू शकले. त्या चारही ठिकाणी विहीर खोदणे व्यर्थ आहे असाच अहवाल त्यांनी दिला. म्हणजे वापरण्यालायक परिमाणात पाणी असणार नव्हते. आमच्या निष्कर्षांची पुष्टी करणाराच अहवाल होता. मात्र निर्णायक नव्हता. कारण संवेदित खोली केवळ १५० फूटच होती.

अखेरचा उपाय म्हणून आम्ही भूमिगत जलसाठ्यांच्या शोधाकरता सरकारी अडतींची मदत घेण्याचा निर्णय घेतला. त्यांची पद्धत भूभौतिक होती. वीजवहनाचे आधारे जमिनीची वाहकता मोजून ते निर्णय करत असत. ठिकठिकाणी विद्युताग्रे लावून, थेट प्रवाह त्यात प्रवाहित करून, ते मापने घेत असत. खोली, आकार आणि साठा यांवर अवलंबून निदाने करत. उपस्कराची कार्यक्षमता लक्षात घेता त्या पद्धतीने २०० फुटांहून खोल ठिकाणी अनुमान करता येणारच नव्हते. त्यामुळे हे निष्कर्षही निर्णायक ठरले नाहीत.

सर्व माहितीच्या विश्लेषणाकरता कर्नल धिंग्रांनी अनेक बैठका घेतल्या. कष्टपूर्वक स्थलतुलना केली गेली. अ आणि क ही ठिकाणे पसंतीची म्हणून निवडली गेली. हे कबूल केलेच पाहिजे की, अंतिम निवडीत म्हणतात तसा सहाव्या इंद्रियाचा उपयोगही झालाच. मग कर्नल धिंग्रा आणि मी या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी पोखरणला निघालो. अंतिमतः निवडलेली

ठिकाणे नवी दिल्लीला, नकाशावर खूण करून पाठविली गेली.

आम्ही 'अ' ठिकाणी पोहोचेपर्यंत सूर्य अस्ताला जात होता. प्रस्तावित विहिरीचे केंद्र स्थानावर निश्चित करायचे होते. मी कर्नल धिंग्रांना विनंती केली की, त्यांनीच त्या ठिकाणी खुंटी ठोकावी. एका शिपायाने त्या जागी खुंटी धरून उभी केली. धिंग्रांपाशी हातोडा दिला. ते पुढे झाले. आम्ही सारेच त्यांच्याभोवती वर्तुळात उभे होतो.

तो क्षणच ऐतिहासिक होता. सूर्यकिरणे वाळूच्या टेकड्यांना सोनेरी रंगाच्या निरनिराळ्या छटांत चमकवत होती. मोठा रम्य प्रसंग होता तो. एकाकी वाळवंटातील शांतता वातावरणास आणखी भारावून टाकत होती. कर्नल धिंग्रा सूर्याकडे तोंड करून उभे होते. एक मिनिटभर त्यांनी डोळे मिटले. बहुधा जगन्नियंत्याचे आशीर्वादच घेतले. प्रसंगाच्या गांभीर्याने आम्हा साऱ्यांवरच गारूड केलेले होते. आम्ही सारेच निस्तब्ध झालेलो होतो. हातोडीच्या ठोक्यानेच ती स्तब्धता लोप पावली.

अंधार पडत होता. आम्ही घाईनेच 'क' स्थळाप्रत निघालो. ते ९०० मीटर दूर होते. तीच प्रक्रिया अवलंबिली गेली. मात्र कर्नल धिंग्रांनी खुंटी ठोकायला मला बोलावले. हा त्यांचा उदार दृष्टिकोन होता. परतीच्या लांबलचक जोधपूर रस्त्यात आम्ही क्वचितच काही बोललो असू. फासा पडलेला होता. भारताच्या आण्विक आशेचे भवितव्य आमच्या निवडीवर अवलंबून होते. या विचाराने आम्हाला भारून टाकलेले होते.

मंजुरी मिळताच काम धडाक्यात सुरू झाले. वाळूचे ढिगारे दूर सारून आम्हाला मिश्र खडक लागला. वालुकाश्म आणि गाळाचा. ६० फुटावरच पाणी झिरपू लागले. खोली गाठणे अवघड होऊ लागले. मात्र आमचे इरादे बुलंद होते. ९०-१०० फुटांवर तर पाणी एवढे झिरपू लागले की, विंधन अशक्य झाले. थांबलेच.

मात्र ११३-इंजिनीअरिंग रेजिमेंटच्या दुर्दम्य इच्छाशक्ती आणि नवोन्मेषशाली पद्धतीने साऱ्या अडचणींवर मात केली. म्हणतात ना 'इतिहास तेच रचतात जे प्रभावी ठरतात'.

आम्ही पाण्याच्या झिरप्यावर कशी मात केली, ते पुन्हा कधीतरी सांगण्याकरता राखून ठेवू.

लेखक कारगील-सियाचेन क्षेत्रात रेजिमेंटचे नेतृत्व करत असत. अणुचाचण्यांकरता विहीर खोदण्याचे काम त्यांना सुपूर्त करण्यात आलेले होते. ते विपुल लेखन करणारे लेखक आहेत. भारताच्या संरक्षण उद्योगातील ते आघाडीचे तज्ज्ञ मानले जातात.

मूळ इंग्रजी लेखकः मेजर जनरल मृणाल सुमन ०५-०७-२०२०

प्रथम प्रसिद्धीः https://swarajyamag.com/defence/a-phenomenal-pokhran-mission-from-site-selection-to-shaft-sinking

मराठी अनुवादः नरेंद्र गोळे २२-०५-२०२५

श्रेय-अव्हेरः या लेखाचे स्वामित्व संपूर्णतः लेखकांचे आहे. अनुवादकाचे श्रेय हे अनुवादापुरतेच सीमित आहे.

अणुचाचणीच्या स्थलनिवडीची कहाणी https://nvgole.blogspot.com/2025/05/blog-post22.html

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

# खगोल-ऋषी - डॉ. जयंत नारळीकर

*थोर खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे २० मे २०२५ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारा श्रद्धांजलीपर लेख - संपादक*

थोर खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे २० मे २०२५ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. आर्यभट व वराहमिहीर यांच्यानंतर बव्हंशी खंडित झालेल्या भारतीय खगोलसंशोधनाचे पुनरूज्जीवन मागच्या शतकामध्ये मेघनाद साहा, वैनू बापू, नोबेल पारितोषिक विजेते सुब्रमण्यन चंद्रशेखर आणि जयंत नारळीकर यांनी केले असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. अशा ऋषितुल्य नारळीकरांना श्रद्धांजली अर्पण करणारा लेख...



डॉ. जयंत नारळीकर

घरामध्ये संस्कृत आणि गणित या विषयांमधील विद्वानांचे वातावरण असलेले जयंत नारळीकर साहजिकच या विषयांमध्ये पारंगत होते. गणितातील संशोधनाचा भाग म्हणून आणि फ्रेड हॉयल यांच्या व्याख्यानांमुळे प्रभावित होऊन त्यांनी खगोलशास्त्रीय विषय हाताळण्याचे ठरवले. १९६३मध्ये त्यांनी पीएचडी पूर्ण केली. १९६५मध्ये भारत दौऱ्यावर आले असता त्यांना पंतप्रधान लालबहादुर शास्त्री व शिक्षणमंत्री छागला यांना भेटण्याची संधी मिळाली. या दोघांनीही त्यांना भारतात येऊन संशोधन करण्याचे आवाहन केले. मात्र तिकडील काही जबाबदाऱ्या पार पाडायच्या असल्यामुळे ते काही काळानंतर भारतात परतले. पुढे तेव्हाच्या सरकारबरोबर ठरवल्याप्रमाणे १९७२मध्ये त्यांनी भारतात परतून मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेत (TIFR) आपले संशोधन चालू ठेवले. देशातील विविध विद्यापीठांमधील अंतराळविषयक संशोधनात कसलीही सुसूत्रता नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. स्वातंत्र्यानंतर झालेली विद्यापीठांची अधोगती पाहता संशोधनातून काही भरीव निष्पत्ती व्हायची तर ती विद्यापीठांमधून नव्हे; तर संशोधन संस्थांमधूनच होईल अशी स्थिती देशात निर्माण झाल्याची जाणीव त्यांना झाली. आयुकाच्या (खगोलशास्त्र व खगोलभौतिकी आंतरविद्यापीठीय केन्द्र) स्थापनेच्या निमित्ताने ही फार मोठी उणीव भरून काढता येईल, असे त्यांना वाटले आणि टाटांच्या संशोधन संस्थेतील सतरा वर्षांची कारकिर्द संपवत त्यांनी युजीसीच्या प्रा. यशपाल यांचे यासाठीचे निमंत्रण स्वीकारले. त्या निमित्ताने संशोधकाचे रक्त असलेल्या डॉ. नारळीकरांनी आपल्यातील उत्तम प्रशासकाचीही ओळख दाखवली आणि भारतातील लाल फितीच्या नोकरशाहीचा सामना करत आयुका ही संस्था केवळ उभी केली एवढेच नाही; तर ती नावारूपाला आणली. विशेष म्हणजे खगोलशास्त्रातील त्यांचे गुरू फ्रेड हॉयल यांनी इंग्लंडमध्ये इन्स्टिटयूट ऑफ थिऑरेटिकल स्ट्रॉनॉमी ही संस्था स्थापन केली होती. डॉ. नारळीकरांनी नेमके तसेच योगदान आयुकाच्या स्वरूपात भारतासाठी केले.

आयुष्यात भेटणारी सगळीच माणसे सारखी नसतात.

### संशोधनाचे स्वरूप

ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंबंधी त्यांनी डॉ. फ्रेड हॉयल यांच्याबरोबर मांडलेल्या 'स्टेडी स्टेट' सिद्धांतामुळे 'बिग बँग' या प्रचलित सिद्धांताला आव्हान मिळाल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र आता उपलब्ध असलेल्या प्रगत उपकरणांच्या सहाय्याने ब्रह्मांडाची जी निरिक्षणे नोंदवली जात आहेत, त्या आधारावर 'स्टेडी स्टेट' सिद्धांत मागे पडल्याचे चित्र आहे. दुसरीकडे 'बिग बँग' सिद्धांतदेखील त्रुटीपूर्ण गृहितकांवर आधारित आहे व त्यातून अनेक निरिक्षणांचे स्पष्टीकरण मिळत नाही. हे संशोधन व प्रत्यक्ष निरिक्षणे केवळ गेल्या काही दशकांमधली असल्यामुळे हे क्षेत्र अद्यापही विकसित होत आहे. याखेरीज डॉ. नारळीकर यांनी गुरुत्वाकर्षणाच्या सुधारित सिद्धांतावर काम केले. माकच्या तत्त्वाचा खगोलशास्त्रात उपयोग करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला.

### पुरस्कार व मानसन्मान

त्यांचे संशोधन चालू असतानाच; म्हणजे १९६५मध्ये वयाच्या सव्वीसाव्या वर्षी त्यांना 'पद्मभूषण' सन्मान मिळाला. त्याचे ते कदाचित सर्वांत तरुण सन्मानार्थी असावेत. पुढे २००४मध्ये यावर 'पद्मविभूषण' सन्मानाचा कळस चढला. १९६३मध्ये म्हणजे शिक्षण चालू असताना ते लंडनमधील रॉयल खगोलशास्त्र सोसायटीचे पार्टनर होते. १९७८मध्ये त्यांना देशातील प्रतिष्ठेचा 'शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार' मिळाला आणि पुढे १९९६मध्ये युनेस्कोतर्फे दिला जाणारा विज्ञानाच्या प्रसारासाठीचा 'कलिंग पुरस्कार' मिळाला. पुढे २००४मध्ये त्यांना फ्रान्सच्या खगोलशास्त्रीय सोसायटीने सन्मानित केले. २०१०मध्ये त्यांना राज्य सरकारचा 'महाराष्ट्रभूषण' हा सन्मान जाहीर झाला. विस्तारभयास्तव त्यांना मिळालेल्या सर्व मानसन्मानांची जंत्री येथे देणे शक्य नाही.

२०१४ मध्ये 'चार शहरांतले माझे जीवन' या त्यांच्या 'आत्मचरित्राला साहित्य अकादमीचा पुरस्कार' मिळाला होता. २०२१च्या नाशिकमधील अ. भा. मराठी साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती.

### भारतीय वारशाचा अभ्यास आणि आधार

'द लाइटर साइड ऑफ ग्रॅव्हिटी' या पुस्तकात त्यांनी गुरुत्वाकर्षणाचा वरवर सोपा वाटणारा, परंतु क्लिष्ट असलेला विषय अतिशय सोप्या व रंजक पद्धतीने समजावला आहे. ते करताना त्यांनी भारतीय संस्कृतीतील ध्रुव ताऱ्यासारख्या उदाहरणांचाही संदर्भ दिलेला आहे. 'द सायंटिफिक एज' (Edge) या आपल्या पुस्तकामध्ये त्यांनी प्राचीन काळापासून आजवरच्या भारतीय संशोधनाचा आढावा घेतलेला आहे आणि एकेकाळी अतिशय प्रगत असलेली भारतातील संशोधनसंस्कृती का ठप्प झाली असावी याचाही उहापोह केला आहे. 'आकाशाशी जडले नाते' या ग्रंथरूपी पुस्तकात त्यांनी खगोलीय विश्वाचा अतिशय सखोल असा आढावा घेतला आहे. ज्याला या क्षेत्रात जेवढी रुची आणि जेवढे कुतूहल तेवढे घेता यावे अशा पद्धतीने या ग्रंथाची उत्कृष्ट मांडणी झाली आहे.

### विज्ञानमूल्य असलेल्या विज्ञानकथांवर भर

संशोधनात आधीच मोठे नाव कमावलेल्या डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांनी आपण मराठीतून विज्ञानकथा लिहू शकतो का, याची चाचपणी केली. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसल्यावर त्यांनी वैज्ञानिक कथा म्हणून केवळ कल्पनारम्य कथानके न निवडता वैज्ञानिक तथ्यांवर आधारित कथा लिहिल्या. मात्र विज्ञानकथा या प्रकाराला आपल्याकडे एकूणच मिळणारा अतिशय थंड प्रतिसाद पाहता त्यांच्या विज्ञानकथा लोकप्रिय होण्यास त्यांच्या संशोधक असण्याचे वलय कारणीभूत झाले असावे असे म्हणण्यास जागा आहे.

डॉ. नारळीकर यांनी विज्ञानलेखनाचे सहा प्रकार सांगितले आहेत. वैज्ञानिक विषयांवरील संशोधन प्रबंध, विज्ञान शाखा-उपशाखांवरील परीक्षणे, वैज्ञानिक मुद्यांची नियतकालिकांमधून केलेली उकल, विज्ञान माहितीकोष, मासिक-पुस्तकांमधील वैज्ञानिक माहिती देणारे लेख आणि कथा-कादंबरी-कविता-नाटके हे ते सहा प्रकार. 'ज्या क्रमाने हे सहा प्रकार मांडले आहेत, त्याच क्रमाने त्यातील विज्ञानाचे प्रमाण कमी-कमी होत जाते आणि त्या-त्या माध्यमाचे महत्त्व वाढत जाते' असे ते सांगतात. 'विज्ञानकथेतून मुख्यत: विज्ञानाचा आणि वैज्ञानिक संकल्पनांचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे व्हायला हवा; मात्र मराठीमध्ये लिहिण्यात येणाऱ्या विज्ञानकथा बव्हंशी भयकथा वाटतात', असे त्यांचे म्हणणे होते.

**विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन म्हणजे नेमके काय?**

संशोधकाचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन हा समाजाच्या कुतूहलाचा विषय असतो. संशोधक देवाचे अस्तित्व मानत नाहीत असा एक सर्वसाधारण समज असतो. मात्र तसे गृहित धरताना देवाच्या अस्तित्वाचे स्वरूप नेमके कोणते; याबाबत अनेकदा गल्लत केली जाते. देव मनुष्यप्राण्याच्या दररोजच्या जीवनावर नियंत्रण ठेवतो हा एक मोठा समज प्रचलित आहे. ती संकल्पना कुतूहल आणि भीती या भावनांपोटी बनते व त्यातून अंधश्रद्धांचा जन्म होतो. मूळ कल्पना शुद्ध न राहिल्यामुळे आस्तिक व नास्तिक या शब्दांनी आपला अर्थ गमावला. मला वाटते की, या ब्रह्मांडाची उत्पत्ती कशी झाली, पृथ्वीवर जीवसृष्टीची निर्मिती कशी झाली आणि शरीरात प्राण आहे किंवा नाही म्हणजे नेमके काय आहे किंवा नाही, या तीन प्रश्नांची उकल झाल्यास देव या संकल्पनेची गरजच उरणार नाही. ती तशी होत नाही म्हणूनच प्रत्येकजण आपापल्या परीने त्याची कल्पना करतो. त्यामुळे डॉ. नारळीकर यांच्या याबाबतच्या भूमिकेबद्दल विशेषत्वाने सांगायला हवे. देव आणि अध्यात्म याबाबत त्यांची भूमिका समन्वयाची होती. 'प्रत्येकाची याबाबतची अनुभूती वेगवेगळी असल्यामुळे ती संकल्पना पूर्णपणे झिडकारणे उचित नाही', असे त्यांचे म्हणणे होते. 'देव आहे की नाही?' याचे थेट उत्तर न देता एक वैज्ञानिक म्हणून विश्वातील नियमांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते, असे त्यांचे म्हणणे होते. एखाद्या कामचुकार विद्यार्थ्याने परीक्षेत यश मिळवण्यासाठी देवाला नवस बोलण्याच्या नावाखाली लाच देण्याचे कबूल केल्यावर प्रत्यक्षात त्याप्रमाणे घडत असेल, तर तो मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांवरचा अन्याय ठरणार नाही का?, असे विचारून डॉ. नारळीकर देव मानायचाच झाला; तर त्यातील फोलपणा व दांभिकपणा सहजपणे दाखवू शकत. एकूण सांगायचे तर 'देव दिसतो का? नाही ना, मग तो नाही' छाप उथळ बुद्धिप्रामाण्यवाद जपणाऱ्यांनी व त्यातून स्वत:ला नास्तिक म्हणवणाऱ्यांनी आपल्याकडे विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन या संकल्पनेचे प्रत्यक्षात फार मोठे नुकसान केले आहे.

डॉ. नारळीकरांचा भारतीय ज्ञानपरंपरेचा मोठा अभ्यास होता. कोणतीही गोष्ट अभिनिवेशातून मान्य करण्याऐवजी त्यामागचा कार्यकारणभाव शोधण्याकडे त्यांचा कल होता. त्यामुळे ज्यास ब्रह्मास्त्र म्हणजे आण्विक अस्त्र समजले जाते, त्यासाठी आवश्यक विद्युतऊर्जा त्या काळात उपलब्ध होती का, या त्यांच्या प्रश्नाने आपल्या भावना दुखावल्या न जाता उलट त्या दिशेने आपल्या विचारांना चालना मिळायला हवी. त्यांच्या अशा विधानांमुळे भारतीय ज्ञानपरंपरेचा व विविध धर्मग्रंथांचा अपमान होतो असा आविर्भाव काही जण आणतात. दुसरीकडे; कशातलेच काही न समजणारेदेखील त्यांच्या विधानांच्या आधारावर त्यांनी असा भारतीय वारसा मोडीत काढला असा सोयीस्कर प्रचार करतात. मात्र यामागे डॉ. नारळीकरांची मूळ संशोधक व चिकित्सक वृत्ती आहे; भारतीय वारशाची टिंगल करण्यासारखी

त्यांची विध्वंसक वृत्ती नव्हती हे लक्षात घ्यायला हवे. त्यांना मिळालेले फार मोठे मानसन्मान पाहता साहित्य क्षेत्रातील सन्मानांचा त्यांना मोह असणे शक्य नव्हते. त्यामुळे खोडसाळ पुरस्कारवापसी मोहिमेदरम्यान त्यांना मिळालेला साहित्य अकादमीचा सन्मान परत करण्यास त्यांनी दिलेला नकार महत्त्वाचा ठरतो. हे त्यांच्या स्वयंप्रज्ञ वृत्तीचे आणखी एक उदाहरण.

**अभिनिवेश विरुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोन**

त्यांच्या वैज्ञानिक लेखनाचे वैशिष्ट्य असे की, ते त्याबाबतीत असलेल्या पारंपरिक गैरसमजुती दूर करतात. उदाहरणार्थ, गॅलेलियो वा इतरांनी केलेल्या संशोधनातील त्रुटींचे बारकावेही ते दाखवून देतात. तेव्हा तीच पद्धत ते प्राचीन भारतीयांच्या संशोधनाबाबत आता उपलब्ध असलेल्या उल्लेखांबाबत अवलंबतात यात आश्चर्य नाही. एखादा सिद्धांत संपूर्णपणे किंवा काही प्रमाणात चुकीचा ठरला, तरी त्या काळात त्याच्या आधारावर पुढील सुधारणा झालेली असते, हे ते उदाहरणांसह दाखवून देतात. पुराणातील विमाने, ब्रह्मदेवाच्या संदर्भातील सापेक्षतावादाचा सिद्धांत, महाभारतातील युद्धाचे वर्णन धृतराष्ट्राला बसल्या जागी सांगणारा संजय, अंतराळात स्वैर संचार करणारे देव-गंधर्व, गणपतीला असलेले हत्तीचे शीर या व अशा अनेक उदाहरणांची आजच्या काळाशी सांगड घालत 'त्या' काळातही आजचे तंत्रज्ञान अस्तित्वात होते, असा दावा करण्याची सहजप्रवृत्ती आपल्याकडे आढळून येते. सहसा असे दावे करणाऱ्या व्यक्ती स्वत: संशोधनक्षेत्रात नसूनही सवंगपणा करण्यात धन्यता मानत असतात. काहीजण याचा प्रतिवाद करताना वेद-उपनिषद-पुराण वगैरे वारशात काही विज्ञान आहे हे साफ नाकारून आपली मानसिक गुलामगिरी दाखवत असतात. तर काहीजण स्वप्नरंजनाचे दुसरे टोक गाठत असतात. डॉ. नारळीकरांचे याबाबतचे म्हणणे इतकेच की, याबाबत केवळ विधानांपेक्षा या दाव्यांना पूरक असे आणखी काही तपशील मिळाले, तर या दाव्यांना पुष्टी देता येईल. आता कालौघात यातले कोणते संदर्भ मिळणे खरोखर शक्य आहे, हा प्रश्न पाहता हे अनुत्तरितच राहील की कसे हे पहावे लागेल. वैज्ञानिक निकष लावले की उपलब्ध पुरावा पुरेसा नाही, असे म्हणावेच लागते; असे असले तरी हा प्रश्न येथे संपत नाही आणि याबाबतचे आव्हान पुराण वाङ्मयसंशोधकांनी स्वीकारावे, असे त्यांचे सांगणे आहे. अर्थात या प्राचीन ज्ञानाचा अर्थ लावून आजच्या संदर्भात ते पडताळून पाहण्यापुरतेच नव्हे; तर भविष्यातील संशोधनासाठी ते कसे वापरता येईल, हे फार मोठे आव्हान आहे. अन्यथा आपण समृद्ध वारसाशून्य नव्हतो हे दाखवण्यापलीकडे त्याचा काही उपयोग उरणार नाही. कारण हे बहुतेक ज्ञान संस्कृतमध्ये उपलब्ध आहे आणि आज बहुतेक वैज्ञानिकांना संस्कृतचे वावडे आहे.

**मातृभाषेतून शिक्षणाची कळकळ**

मातृभाषेतून शिक्षणाचे फायदे सर्वविदित आहेत, परंतु देशातील शासनव्यवस्थेच्या इच्छाशक्तीचा अभाव ते प्रत्यक्षात आणण्याच्या नेहमीच आड येतो. जर विचार करण्याची क्षमता मातृभाषेतील शिक्षणामुळे वृद्धिंगत होत असेल, तर मग त्याचा मुलांच्या कल्पकतेवरही विपरित परिणाम होत नसेल का? मात्र आपल्याकडचा विचारप्रवाह असा असतो की, किमान गणित आणि विज्ञान हे विषय तरी इंग्रजीत जावेत. उलट नेमक्या याच कारणाने डॉ. नारळीकर विज्ञानाचे विषयदेखील मातृभाषेतून शिकवले जावेत असे सांगत. इंग्रजी माध्यमातून शिकण्यातून इंग्रजी भाषा येण्याखेरिज (अर्थात हेदेखील साध्य झाले तर!) आणखी काय साध्य होते हा प्रश्न ते उद्विग्नपणे विचारत. नव्या शिक्षणधोरणामध्येही या वास्तवावरच्या उपाययोजनेला थारा दिलेला नाही हे लक्षात येईल.

(पृष्ठ क्र. २८ वर)

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून ‘उंट’ या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

**Empowerment - सक्षमीकरण**

रायका साधाच राहिला. त्याचे मोठे नुकसान झाले, त्याने कधीही जमीन संपादन केली नाही. त्याने आपले काम उंटांच्या प्रजननापुरते मर्यादित ठेवले. आम्हाला वाटले की, ते गौरवशाली दिवस नेहमीच तसेच असतील.

बिकानेर येथील रायका महिला, व्ही.के. श्रीवास्तव यांनी राजस्थानच्या, ‘पशुपालक जातींची (जमाती)’ काही वैशिष्ट्ये, यामध्ये, उद्‌धृत केली आहेत. ‘रायका पुरुष गायीसारखे सरळ असतात; रायका स्त्रिया कोल्ह्या सारख्या धूर्त असतात.’ एक रायका म्हण.

**Chapter 10 – सक्षमीकरण**

दुधाच्या प्रकल्पाने दाखवून दिले की, रायकांचे विचार व संस्कृती हे एका बाजूला व शिक्षणाने तयार झालेले प्राण्यांचे तज्ज्ञ व शहरी लोक दुसऱ्या बाजूला. त्यामुळे यांच्यातील मोठी दरी दिसून आली. या दोघांचे जग वेगळे होते. ज्या कल्पना मदत करणाऱ्या संस्थेला योग्य वाटत होत्या त्या कल्पना स्थानिक संदर्भांत उपहासाचा विषय होत होत्या. साद्रीमधल्या घटना बहुतेक वेळा असाधारण व अंदाज न करता येण्यासारख्या पद्धतीने उलगडत असत. जोधपूरच्या कृपाछत्राखाली साद्रीला प्रकल्प चालवणे अतिशय कठीण होते. यावर विचार केल्यावर तिला व हणमंतला असे वाटले की, एक संस्था स्थानिक ठिकाणी असावी, जिच्यामध्ये रायकांचा समावेश असेल व ते त्यांच्या दृष्टीकोनातून त्यांच्या अडचणी व गरजा सांगू शकतील. म्हणून दूध प्रकल्पाच्या शेवटच्या टप्प्यांत त्यांनी अशा कार्यपद्धतीचा शोध घ्यायला सुरवात केली. अशी सोसायटी उभी करायला सात जणांची आवश्यकता होती. पण ही गोष्ट सोपी नव्हती. कारण रायकांच्या मुलांना जनावरांच्या मागे धावणं पसंत नव्हते व रायकांना लिहिता-वाचता येत नव्हते, त्यांना कागदपत्रे वाचता येत नव्हती, आणि केवळ त्यांच्या अंगठ्याच्या ठशाच्या सहाय्याने स्वाक्षरी करता येत होती. ऐच्छिक समाजकार्य ही कल्पना माहीत नव्हती. त्यांना पारंपरिक अर्थाने शिक्षण नव्हते किंवा व्यापक जगाशी संपर्क साधला नव्हता, ते स्वयंसेवी समाजाच्या कार्याशी पूर्णपणे अपरिचित होते. राजस्थानच्या इतर भागांप्रमाणे, गोदवारमध्ये सामाजिक कारणे आणि उन्नतीसाठी काम करणारी कोणतीही स्वयंसेवी संस्था नव्हती, त्यामुळे स्थानिक लोक आणि समुदायांना मदत करण्यासाठी बाहेरील लोक येण्याची कल्पनाही नवीन व शंका निर्माण करणारी झाली. त्यांना असे वाटत राहिले की, इल्सला सर्व उंट जर्मनीला न्यायचे आहेत किंवा त्यांच्या मुलांनाही विमानाने पळवून न्यायचे आहे. अशा प्रकारच्या अफवा मधून मधून उठत राहिल्या.

जरी सामाजिक कार्य व एकत्रीकरण ही कल्पना नवीन होती तरी, धर्मार्थ दान ही कल्पना नवीन नव्हती. जैन समाज गोशाळा बांधणे व चालवणे, आजारी व भाकड गाईंची राहण्याची व्यवस्था व जनावरांना औषधपाणी करत. जैन समाज रायकांचे आश्रयदाते होते. काही श्रीमंत लोक भटक्या कुत्र्यांना अन्न देत

असत, तर काही जनावरांचे हॉस्पिटल बांधण्यास मदत करत किंवा पशुवैद्यकीय उपचारासाठी शिबिर घेत. बरीचशी कामे धार्मिक संस्थांकडून होत असत व ती बहुदा प्राणी-केन्द्रित असत. सरंजामशाहीपासून अशीही एक परंपरा होती की, रायका ज्यांच्याशी त्यांचे संबंध होते अशा राजपुतांकडे मदत, समर्थन आणि अनेकदा पैसे मागत. या संरक्षकांना त्यांचे सर्वोत्तम अनुदान देण्याचे निश्चित बंधन होते व त्यातून ते प्रतिष्ठा व अनुयायी मिळवत. ते इल्सकडे मोठ्या प्रमाणांत पैसे मागत. त्यामुळे ती खूप नाराज होत असे. तिला वाटे की, लोक तिच्याशी चांगले वागतात कारण त्यांना ती 'पैशाची चालती बोलती थैली' आहे असे त्यांना वाटते. नंतर तिच्या लक्षांत येते की, अशी पैशाची मागणी ते हणमंत व इतर परदेशी भारतीयांजवळही करतात.

तिला असे वाटत होते की, पुन्हा एकदा रायका समाजाने त्यांच्या व्यवसायाचा अभिमान बाळगला पाहिजे. त्यासाठी सामाजिक एकत्रीकरणाची व त्यांनी स्वतःची जबाबदारी स्वीकारण्याची गरज होती. इल्सला रायका समाज मागासलेला आहे हे ऐकण्याचा कंटाळा आलेला असतो. ते सामाजिक दृष्ट्या अतिशय पुराणमतवादी असतात. त्यांच्यात बाल विवाहाची पद्धत असते. पण सज्ञान होईपर्यंत जोडप्याचा संबंध येत नाही. त्यामुळे भारताच्या इतर भागांत असलेल्या पद्धतीपेक्षा ही वेगळी नसते. पण पशुपालनाची त्यांची पद्धत अतिशय योग्य असते. मग ते उंट, गाय, बैल, शेळ्या-मेंढ्या कोणाचेही पालन असो;- ते अतिशय बेभरवशाचा पाऊस, पाण्याची टंचाई, शेतकऱ्यांनी डिझेल पंपांनी ट्यूब वेल्सनी जमिनीतील पाणी खेचून घेतल्यामुळे कोरड्या पडलेल्या विहिरी अशा परिस्थितीत काम करतात. पडीक जमिनींवर चरावू जनावरांचे पालन ही जमिनीचा उपयोग करायची योग्य, शाश्वत पद्धत होती. जनावरांचा मोठा कळप पाळायला कौशल्य व अनुभव लागतो तो रायकांजवळ होता. ते त्यांच्या आवाजाने मोठ्या कळपांवर नियंत्रण ठेवीत व काठीच्या सहाय्याने जनावरांचे मोठे कळप रस्ता क्रॉस करत. कुठच्या सिझनमध्ये कुठे चरावू जमीन आहे व कुठच्या वनस्पतींचा त्यांच्या दुधाच्या चवीवर काय परिणाम होतो हे त्यांच्यापेक्षा जास्त चांगले कोणाला माहीत नव्हते. त्यांना प्रत्येकांची नावे, त्यांच्या आयुष्याचा इतिहास, त्यांच्या पूर्वजांची नावे, त्यांच्या आयांची नावे माहीत होती. त्यांच्याशी असलेल्या जवळच्या नात्यामुळे त्यांना नावाने हाक मारली, की ते लगेचच ते प्रतिसाद देत असत. शिवाय रायकांचे पशुपालन व जनावरांचे स्वास्थ्य, पर्यावरणाचा दृष्टीकोन याखेरीज राजस्थानचा आर्थिक फायदाही होता. पुष्करच्या जत्रेत अनेक गरीब उंट-पालकांना उंटांना वाढवून व पाळून जत्रेत विकून फायदा होत होता. हे उंट सामानाच्या वाहतुकीसाठी शहरात व गावात वापरले जात. पण जास्तीत जास्त रायका हे शेळ्या व मेंढ्या पाळायचा धंदा करत व त्यांच्या मटणाला मध्यमवर्गांत व परदेशांत खूप मागणी होती. इल्सच्या मते रायका हे प्राण्यांचे प्रजनन व पालन करणारे सर्वोत्कृष्ट होते. याचा फक्त त्यांनाच नाही तर राजस्थानच्या सर्व जातींना त्याचा अभिमान असायला हवा होता. राजस्थानला त्याच्या ऐतिहासिक वारशा बद्दल खूप अभिमान आहे; पण तिच्यामते रायकांचे त्यांच्या जनावरांबरोबचे संबंध हे जतन करण्यासारखा एकमात्र मानवी वारसा आहे.

पण रायकांना त्यांच्या या आर्थिक व्यवसायासाठी ना कधी मान्यता वा श्रेय अथवा ना सरकारकडून मदत मिळाली. सरकारी पशुवैद्य व रायकांमध्येही फारसे संबंध नव्हते. ते रायकांच्या जुन्या पद्धतीमुळे त्यांना कमी लेखत होते. रायका त्यांच्या जनावरांसाठी कधीच सरकारी पशुवैद्यांचा सल्ला घेत नसत. त्यांच्याकडून लसीकरणही करून घेत नसत. त्यामुळे पाय व तोंडाचे रोग सर्रासपणे पसरत होते.

म्हणून त्यांनी शेवटी नवीन सोसायटी स्थापन करायचे ठरवले, त्याची उद्दीष्टे अशी होती, -

१)पशुपालनावर अवलंबून असणाऱ्या लोकांना मदत व त्यामध्ये लेखी व्यवहारांची नोंदणी २) पारंपरिक ज्ञानाची वाढ, ३) जनावरांच्या आजारांवर नियंत्रण ठेवणे. ४) जनावरांपासून मिळणाऱ्या ऊत्पन्नांत वाढ करणे. ५) शैक्षणिक पाठिंबा किंवा मदत करणे. ६) चरावू जमिनीची, कुरणांची वाढ करणे. विचाराअंती या संघटनेला, लोकहित पशुपालक संघटन किंवा, LPPS असे नाव द्यायचे ठरले. म्हणजेच, पशुपालकांसाठी कल्याणकारी संस्था.

त्यांच्या पहिल्या प्रकल्पाला त्यांनी नाव दिले, - 'रायका उंट पालक व प्रजाजन करणाऱ्यांचे सक्षमीकरण. (empowerment)' त्याचा हेतू होता, उंट पालनासाठी चालू केलेल्या प्रकल्पांना पुढे नेणे व त्यांचे एकत्रीकरण व दुधाच्या विक्रीचे व्यवस्थापन करणे. कालांतराने ते या सर्व गोष्टी इतर भागांत करू इच्छित होते व इतर ठिकाणी उपकेन्द्र व उंट प्रजनन चालू करू इच्छित होते. बारनेर जिल्हा जो पाकिस्तांनच्या सीमेवर आहे व त्यांत उंटाची खूप पैदास होते.

त्यांना नवीन ऑफिसची व स्टाफची गरज होती. पण यावेळेस त्यांचा आत्मविश्वास चांगला होता. त्यांचे पहिले ऑफिस एका बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावर एक छोटी खोली जिच्यासमोर साद्रीचा गर्दीचा बसस्टँड दिसतो. त्या खोलीत फक्त एक टेबल, खुर्ची व छोटेसे औषधांचे कपाट एवढेच सामान बसू शकत होते. बाल्कनीत पाहुणा बसू शकत होता. एक दिवस हाजीरामजी, खुनीबर्वीचा उंट पालक, त्याचा मुलगा घिसूसालसाठी नोकरी मागायला येतो. तो शहरांत काम करत असतो व आता त्याची बायको इकडे नांदायला येणार असते म्हणून त्याला नोकरी हवी असते. तो वीस वर्षांचा आनंदी, उत्साही तरुण असतो. त्याला ते काम देतात.

त्यांना रायकांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे करायचे असते. त्याच्यावर अवलंबून ठेवायचे नसते. रायकांची अपेक्षा असते की, त्याच्या उंटाना फुकट औषधे मिळावीत. पण हा इतर भागांत राहणाऱ्या उंटपालकांवर अन्याय असतो. म्हणून ते शेवटी ठरवतात की, पहिल्यांदा ज्यांनी नोंदणी केली आहे त्यांना अर्धे शुल्क व जे नवीन नोंदणी करतील त्यांना पूर्ण शुल्क. तरीही नवीन नोंदणी करणारे उंटपालक आनंदी होते. कारण त्यांना मिळणाऱ्या या औषधांची किंमत केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा कमी होती. ही औषधे खरी होती. कितीतरी वेळा केमिस्टकडे मिळणारी औषधे बनावट असत व रायकांच्या अशिक्षिपणाचा फायदा घेऊन जास्त किंमतीलाही विकत असत. काही वेळा रायका एक डोस दोघांमध्ये देत किंवा एखादा उंट जास्त आजारी असला तर त्याला डबल डोस देत. हे सर्व पाहिल्यावर ती ठरवते की, रायकांच्या सक्षमीकरणांसाठी ठिकठिकाणी कॅम्पस् घेऊन रायकांना नवीन औषधांची माहिती करून द्यायची. औषधाचा डोस केवढा हवा, किती वेळा औषधे द्यायची हे सांगायचे. उंट फार कमी आजारांना बळी पडत असत. त्यांचे मुख्य आजार मॅनगे व ट्रायपोनोसोमियासिस होते म्हणून खूप थोड्या औषधांची माहिती करून घ्यायची जरूरी होती. या प्रशिक्षणाचे कार्यक्रम अतिशय लोकप्रिय होतात. ते 'ग्रामीण सुधारणा' संघटनेच्या लोकांनाही बोलावतात. म्हणजे वेगवेगळ्या भागांत ते या माहितीचा उपयोग करू शकतील. त्यांनी वेगवेगळ्या आजारांचे व पारंपरिक व आधुनिक उपचार पद्धतीचे अनेक फोटो जमा केले. त्या सर्वांचा इल्सने स्लाईड शो तयार केला. फक्त रायकांनाच हा स्लाईड शो आवडला असे नाही, तर हे सादरीकरण इतरांनाही दाखवण्यास उपयोगी होते की, रायका व त्यांची उपचार पद्धत ही ढोंगी किंवा बनावट नव्हती. त्यांच्याजवळ खूप माहिती व ज्ञान होते, पण ते आधुनिक उपचार पद्धतीशी जुळणारे नव्हते.

स्वतःची चूक स्वतःला कळली की बरेच अनर्थ टळतात !

त्यांना राजस्थानच्या इतर भागांत काम करायलाही जोडीदार हवे होते, म्हणून त्यांनी इतर सेवाभावी संस्था कसे काम करतात याचा अभ्यास केला. पण त्यांना असे दिसले की, या संस्थाही सरकारी पद्धतीप्रमाणेच काम करतात. ते कृत्रिम गर्भधारणा, स्थानिक गाईंचे परदेशी गुरांबरोबर संकरीत प्रजनन याला पाठींबा देत व पशु वैद्यकीय शिबीरे घेत. त्यांचे प्रयत्न रायकांचे पारंपरिक ज्ञान नवीन पद्धतीने बदली करायचे असे.

पारंपरिक ज्ञान हा ग्रामीण लोकांचा मोठा ठेवा होता ते त्यांना अधुनिक तंत्रज्ञानाने बदलायचे होते. या सर्व गोष्टी पाहिल्यावर किंवा लक्षांत आल्यावर इल्सने पारंपरिक ज्ञानाचे प्रदर्शन व त्याला प्रोत्साहन द्यायला सुरवात केली. या सर्व प्रयत्नांत त्यांना युरोपीयन युनिव्हर्सिटीतील विद्यार्थ्यांची मदत मिळाली. यांच्यामध्ये हॅालंडचा एलन गिरलिंगस होता. त्याने रायकांच्या मेंढीपालनाच्या पद्धतीवर संशोधन केले व त्यांच्या प्रजनन पद्धतीतील गुंतागुंत दाखवली. मेंढ्यांना उंटापेक्षा होणाऱ्या अनेक आजारांचे रायकांनी अतिशय क्लिष्ट रोग वर्गीकरण प्रणाली विकसित केली होती. त्यांचे साथीच्या रोगांचे ज्ञान हे पशुवैद्यकीयांच्या ज्ञानापेक्षा खूप जास्त होते. त्याने गोळा केलेली ती माहिती अनेक सेवाभावी संस्थानसाठी कार्यशाळा घेऊन, तसेच सरकारी पशु संवर्धनाच्या विभागांतील लोकांना बोलावून दिली. या वेळी पारंपरिक पद्धतीने उपचार करणाऱ्यांना त्यांचे ज्ञान प्रत्यक्ष दाखवून द्यायची व नकली म्हणून असलेली त्यांची ख्याती खोडून काढायची संधी दिली. हणमंतच्या संघटनात्मक कौशल्यामुळे आणि राजपूत आदरातिथ्य आणि शिष्टाचाराच्या विशेष गुणामुळे त्याने प्रत्येक गोष्टीत भर घातली. त्यांनी पारंपरिक आणि आधुनिक विचारवंतांमधील भांडणे बंद केली.

इल्सला वाटू लागते की, त्याच्या या सर्व कामांसाठी त्यांना एका सेंटरची गरज आहे. जे पारंपरिक व आधुनिक ज्ञान व माहिती मिळण्याचे ठिकाण (केन्द्र ) असेल. ते प्रदर्शने भरवू शकतील, जाहिराती (posters) लावू शकतील अशी जागा हवी होती. काही वर्षांपूर्वी त्यांनी एक शेतातील जमिनीचा तुकडा कुंभलगड अभयारण्याच्या टोकाशी विकत घेतलेला असतो. तो साद्री पासून थोडा लांब ७ कि. मी. असतो. तरी त्यावर इमारत बांधता येणे शक्य असते व उंटाच्या एखाद्या पूर्ण कळपावर उपाय करता येणे शक्य असते. १९९९ मध्ये जर्मन सरकार त्यांना आर्थिक सहकार्य करायला तयार होते, पण त्यांनी पैसे एका महिन्यात वापरले पाहिजेत अशी अट घालते. एका महिन्यांत इमारतीचे काम पुरे करणे अशक्य गोष्ट असते.

हणमंतने बांधकाम साहित्याची जमवाजमव केली. मेघवाल समुदायातील जवळजवळ सर्व बांधकाम स्त्रियांच्या संघाची अद्भूत उद्यमशीलता आणि कौशल्य कामी आले. त्यांचा बुरखा, लांब घागरा, हातांतल्या प्लॅस्टीकच्या बांगड्या, कोपरापर्यंत आलेले चांदीचे दागिने, या सर्वांनी नाउमेद न होता, त्यांच्या बायकांनी सातही दिवस सकाळी नऊ वाजल्यापासून संध्याकाळी सहापर्यंत फक्त मध्ये एक तासाची सुट्टी घेऊन काम केले. एका महिन्यांत त्यांनी एक मोठा हॅाल व दोन खोल्या बांधल्या. हे काम त्या हसतमुखाने गाण्याच्या तालावर करीत. फक्त वायरींग व इलेक्ट्रीक कनेक्शन पुरे झाले नाही. हे कळताच जर्मन सरकारने खरडपट्टी काढली. पण तिला हे सांगायची इच्छा होती की, 'या भागांत कधीच वीज नीट नसते.'

ते नवीन इमारतीचे जोरदार उद्घाटन करतात. हणमंत जर्मन दूतावासातील त्याचा मित्र गुणार डॅनेक याला मुख्य पाहूणा म्हणून बोलावतो. ते जयपूर मधल्या पशुसंवर्धनच्या संचालकाला बोलावतात. त्याच्या पाठिंब्याने औषधे वाटण्यासाठी गरज होती. घानेराहोहून राणीसाहेब येतात. एल्सची मैत्रीण पूर्णिमा सिंग व तिची

आई दिल्लीहून येतात. पूर्ण रायका समुदायाला बोलावले जाते. हणमंत मोठा लग्नाचा शामियाना किंव तंबू ज्यात दोन हजार लोक बसू शकतील. स्पीकर, जेवण व संगीताची तयारी करतो. ते दोन हजार ते तीन हजार पाहुण्यांची अपेक्षा करत होते. तो कार्यक्रम अतिशय पाहण्यालायक असणार होता.

रायका आदल्या दिवशी संध्याकाळपासून यायला लागतात. जर्मन राजदूत, पुजारी व पशुसंवर्धनाचा संचालक या सर्वांना ट्रेनिंग सेंटर पासून एक मैलावर हार घालून नंतर उंटावरून वाजत गाजत आणण्यात येते.

त्यांचे एक आणखी महत्त्वाचे उद्दिष्ट या प्रकल्पांत होते, की रायकांना त्यांची स्वतःची सोसायटी उभी करायला मदत करायची की, कालांतराने ते यांच्यावर अवलंबून राहणार नाहीत. पण रायरांचे पारंपरिक जातीय पंचायत. ते फक्त वयोवृद्ध पुरुषांचे व पंतांचे संघटन होते. ते मुख्यतः लग्नासंबंधी समस्या सोडवत व निर्णय देत. पंच होण्यासाठी काही निवडणुकीची पद्धत नव्हती. म्हातारी माणसे जी आता जनावरांचे कळप सांभाळू शकत नव्हती, ती पंच म्हणून काम करत. अनेक पातळींवर पंचायत असे. ग्रामीण पातळीवर, बावीस गावे मिळून, (सामाफ्ली), चव्वेचाळीस गावे मिळून (चाताला), अठ्ठ्याऐंशी गावे मिळून (परसोताला) आणी संपूर्ण गोदवार प्रान्त (नव प्रगना) हणमंत व ती नेहमीच एखाद्या प्रकल्पांसाठी पंचायतीची संमती घेत. पंचायतीने त्यांना त्याच्या सभेसाठी बोलावण्यात अनेक वर्षे गेली. पंचांचे निर्णय फारसे आदरणीय नव्हते. त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होते. पंचांचे निर्णय हे बहुदा सामाजिक विषयांसाठीच होते. बालविवाहासंबंधी समस्या, बायकांनी काय कपडे घालायचे, त्यांच्या घागऱ्याची लांबी, त्यांनी किती हातभर बांगड्या घालायच्या. अनेक बायकांची या विरुद्ध तक्रार होती. त्यांनाही साडी किंवा सुटसुटीत सलवार कुडता घालायचा असे. पंचानी जास्त चहा पिण्यावर, तसेच समारंभावर जास्त पैसे खर्च करण्यावरही काहीवेळा बंदी घातली होती. खूप वर्ष पंचायत पक्की घरे बांधायला विरोध करत. त्यांच्या मताप्रमाणे यामुळे चराऊ जमीन कमी होत होती. पण गुरांवर असलेली उपजीविका, त्या संबंधीची साधने, जनावरांच्या चरण्यासंबंधिचे प्रश्न व त्यांचे आरोग्य कसे सुधारायचे यावर काहीच चर्चा होत नसे. कारण पंचायतीतील लोकांकडे आता जनावरे नव्हती व ज्यांच्याकडे होती त्यांना सभेला यायला वेळ नव्हता. त्यांना समजत नव्हते की, रायकांची सोसायटी कशी उभी करायची व वाढवायची, जी LPPS ची जागा घेऊ शकेल.

रायकांच्या बायका अतिशय कणखर असतात. त्यांना खूप वेळा 'कुटुंबाचे अर्थमंत्री' म्हणून संबोधिले जायचे. कुटुंबाचा पैसा कसा खर्च करायचा ते त्या ठरवीत. कितीतरी घरगुती निर्णय त्या घेत. शेण विकणे, जर त्या मेंढ्यांचे प्रजोत्पादन करीत असतील तर पशुधन व्यापाऱ्यांशी सौदा करणे. पण दुर्दैवाने उंट पालन व प्रजनन हे पुरुषांचे क्षेत्र समजले जाई. फक्त दलीबाई नावाची बाई उंट पालन करत असे, कारण तिचा नवरा जातीच्या राजकारणांत पंचाचे काम करत होता. रायकांच्या शिष्टाचारा प्रमाणे, बायकांनी खुर्चीवर बसायचे नाही. त्यांच्या नवऱ्यांसमोर किंवा मोठ्या व्यक्तिसमोर घुंगट न घेता बसणे किंवा बोलणे हे अतिशय उद्धटपणाचे व कल्पनेच्या पलीकडचे समजले जात होते. दलीबाईसारख्या बायका ज्या अनेक निर्णय घेत व अतिशय सामर्थ्यवान होत्या त्याही आपल्या नवऱ्यासमोर खुर्चीवर बसायचा विचारच करू शकल्या नसत्या. इल्सला काहीवेळा रायकांच्या या सामाजिक पद्धतींचा खूप राग येत असे व तिने तिच्या आयुष्याची इतकी वर्षे कोणासाठी फुकट घालवली असा प्रश्न पडत असे! पण शेवटी प्रेम म्हणजे सर्व दोषांसकट स्वीकार करणे. ती नेहमी विचार

करते की, या गोंधळात ती कशी राहिली? ती स्वतःला दोष देते. पण आता मागे फिरणे शक्य नसते. अतिशय सनातन विचार व आपल्या जुन्या मूल्यांना चिकटून इतर समाजाप्रमाणे काळाबरोबर वाहत न जाणे हे रायकांचे विशेष वैशिष्ट्य होते. दुष्काळी परिस्थितीतही त्यांनी आपली प्रतिष्ठा व अहंकार सोडला नाही.

म्हणून त्यांचे सक्षमीकरण हे खूप मोठे कठीण काम होते. ते रायकांना तांत्रिक कौशल्य शिकवू शकत होते. ते जगाला त्यांच्या स्थानिक ज्ञानाविषयी, त्यांच्या प्राणी प्रेमाविषयी, त्याच्या कोरड्या सभोवतालचा उपयोग करण्याचे कौशल्य व ही जीवन पद्धती चालू ठेवण्याची त्यांची माणूसकीने जगण्याची इच्छा याबद्दल सांगू शकतात. पण कधीकधी ती त्यांच्या कामाबद्दल खूप निराश होते. त्यांच्या सामाजिक पद्धती तिला आवडत नाहीत. पण त्यांत ढवळाढवळ करण्याचा तिला काय अधिकार आहे? इल्स म्हणते, 'मी माझ्या आयुष्याची अनेक वर्षे फुकट घालवली का?' सर्व सोडून द्यायचा ती विचार करते आणि परत एकदा अविचारी बेरड, अफूने गोंधळलेला दाढीवाला म्हाताऱ्याचे त्याच्या नातवावरचे प्रेम पाहून ती आकर्षित होते. किंवा बदमाष अडोजी, ज्याच्या बरोबर ते वर्षानुवर्षे भांडतात, तिला कळवतो की, 'त्यांच्या नवीन उंटाचे बाळ किती चांगले वाढत आहे. याला तुम्ही प्रजननासाठी ठेवून द्या' किंवा त्यांच्या कट्टर विरोधकाच्या लक्षांत येतं, 'बाइजी आज ठीक दिसत नाही, व तो ताकाचा ग्लास मागवतो. ती त्यांना सुधारू शकत नाही. ते त्यांनी स्वतःच करायला हवे.

या सर्व गोष्टींमुळे ती पुन्हा एकदा त्यांच्याकडे आकर्षित होते.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी - ९८३३०२९३५६

●●●

(पृष्ठ क्र.२२ वरून – **खगोल–ऋषी – डॉ. जयंत नारळीकर**)

**विज्ञानप्रसार**


सेलिब्रिटी आणि सह्यांसाठी चाहत्यांची गर्दी हा प्रकार आपल्याला नवा नाही. डॉ. नारळीकरांच्या स्वाक्षरीसाठी बाळगोपाळांची झुंबड उडत असे. त्यावेळी ते अगदी प्रेमाने त्यांना सांगत की, 'तुम्ही पोस्टकार्डाद्वारे त्यांना एक प्रश्न विचारा आणि मग ते उत्तरादाखल जे पत्र पाठवतील त्यावर त्यांची स्वाक्षरी मिळेल.' अशा प्रकारे हजारो मुलांना त्यांनी प्रश्न विचारण्यास प्रवृत्त केले आहे. त्यापैकी काही प्रश्नोत्तरे पुस्तिकारूपाने प्रसिद्ध केली आहेत. आपल्याकडे बालसाहित्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जाते म्हटल्यावर कुमार वयातील विविध टप्प्यांच्या गरजा ओळखून त्याला अनुसरून वैज्ञानिक कथांचे लेखन करणे हे तर कल्पनेपलीकडचे ठरते. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व्हावा ही डॉ. नारळीकरांची कळकळ होती.

केवळ विज्ञानकथांमधूनच नव्हे; तर प्रत्येक वयोगटाशी विज्ञानविषयक व खगोलविषयक चर्चा करताना त्यांना समजेल अशा अतिशय सुबोध मराठी व इंग्रजीतून तो विषय समजावून सांगण्याची हातोटी डॉ. नारळीकरांकडे होती. त्यात अतिशय सहजता असे. ते कोणताही बडेजाव मिरवत नसत. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेतून प्रेरणा घेतलेल्या मुला-मुलींची आणि तरुण-तरुणींची संख्या फार मोठी आहे. ऋषितुल्य डॉ. नारळीकर केवळ आपली सामाजिक व्यंगे दाखवणारे नव्हते. ते स्वत: त्यावर उपाय शोधत राहिले. देशाने एक थोर खगोल-ऋषी गमावला आहे.

**– राजेश कुलकर्णी**
ज्येष्ठ लेखक
पुणे

●●●

# !! भावपूर्ण श्रद्धांजली !!



**डॉ. अशोक नारायण बापट**

विद्या प्रसारक मंडळाच्या सद्य कार्यकारिणी सभासद सौ. अल्पना अशोक बापट यांचे पती आणि मंडळाचे माजी कार्यकारिणी सभासद व ठाण्यातील प्रसिद्ध मूत्रविकारतज्ज्ञ (युरोलोजिस्ट) डॉ. अशोक नारायण बापट यांचे रविवार, दि.०१.०६.२०२५ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांच्या रहात्या घरी दुःखद निधन झाले.

डॉ. अशोक बापट हे दि. १५.०१.१९९५ पासून आश्रयदाते वर्गाचे सभासद म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या कुटुंबामध्ये सहभागी झाले. पुढे तत्कालीन अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांचेतर्फे दि. ०१.१०.१९९५ च्या कार्यकारिणी सभेपासून म्हणजे १९९५-९६ पासून डॉ. अ. ना. बापट मंडळाच्या कार्यकारिणी समितीवर निवडले गेले. तेव्हापासून दि. ०५.०८.२०२० पर्यंत, म्हणजे सुमारे २५ वर्षे ते मंडळाच्या शैक्षणिक कार्यात कार्यकारिणी सभासद म्हणून सक्रिय राहिले. तसेच ते मंडळाची कार्यकारिणी समिती सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा, मंडळाच्या शाळा - महाविद्यालयांचे वार्षिक स्नेहसंम्मेलन, सांस्कृतिक कार्यक्रम इ. ना आवर्जून हजर रहात असत.

ठाण्यातील आपली डॉ. बापट शुश्रूषालयाची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळत, त्यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक कार्यातही मोलाचे योगदान दिले आहे. शिवाय, 'सत्कर्म प्रतिष्ठान संस्था', ठाणे, या डॉ. वा. ना. बेडेकर स्थापित सेवाभावी संस्थेमार्फतही त्यांनी समाजसेवेचे बहुमोल कार्य केले. अशा समाजसेवक व्यक्तीच्या जाण्याने विद्या प्रसारक मंडळाच्या कुटुंबात पोकळी निर्माण झाली आहे.

श्रीमती अल्पना बापट व त्यांच्या कुटुंबीयांवर झालेल्या या दुःखात विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त, कार्यकारिणी सभासद व सर्वसाधारण सभासद, तसेच मंडळाच्या शाळा व महाविद्यालयांचे प्रमुख व सर्व कर्मचारी सहभागी आहेत. त्यांच्यावर झालेला हा आघात सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो, तसेच परमेश्वर डॉ. अ. ना. बापट यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

**ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा शालांत परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.**

या परीक्षेसाठी एकूण १३६ विद्यार्थी बसले होते. सर्व प्रथम क्रमांक कु. दाते अवनी नीतिन अपूर्वा ९९.८०%. संस्कृतमध्ये ३ विद्यार्थ्यांना १००/१०० गुण प्राप्त झाले आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन करताना शालेय व्यवस्थापन आणि पालकांचे आभार प्रदर्शित केले. 'हा निकाल विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीने आणि सर्व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे शक्य झाला आहे.' असे मत त्यांनी व्यक्त केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१ मे – महाराष्ट्र दिन –** १ मे रोजी महाराष्ट्र दिना निमित्त विद्या प्रसारक मंडळातर्फे प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आला. ध्वजारोहणसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



**नीट परीक्षा २०२५ –** नीट परीक्षा २०२५ साठी वि.प्र.मं चे विधी महाविद्यालय केंद्र होते. सदर परीक्षेचे प्रशिक्षण दिनांक ३ मे रोजी व परीक्षा दिनांक ४ मे रोजी पार पडली. दिनांक ३ मे रोजी पार पडलेल्या प्रशिक्षणा दरम्यान केंद्रप्रमुख डॉ.श्रीविद्या जयाकुमार व उपकेंद्रप्रमुख प्रा. यतीन पंडित ह्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.




**DPC - I अतिरिक्त परीक्षा ५ मे रोजी घेण्यात आली**

**लोकअदालत** DLSA **ठाणे** – १० मे २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे द्वारे राष्ट्रीय स्तरावरील लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. आमच्या महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांनी यासाठी स्वयंसेवक म्हणून काम केले.




**सत्र – II आणि सत्र – IV परीक्षा**

| दिनांक | विषय | वेळ |
|---|---|---|
| ७/०५/२०२५ | भारतीय न्याय संहिता | १०.३० ते १.०० |
| ९ /०५/२०२५ | भारताचे संविधान कायदा – १ | १०.३० ते १.०० |
| १४/०५/२०२५ | कौटुंबिक कायदा – १ | १०.३० ते १.०० |
| १६/०५/२०२५ | पर्यावरण कायदा | १०.३० ते १.०० |

| दिनांक | विषय | वेळ |
|---|---|---|
| ७/०५/२०२५ | विधितत्वमीमांसाशास्त्र | २.३० ते ५.०० |
| ९ /०५/२०२५ | करार कायदा -२ | २.३० ते ५.०० |
| १४/०५/२०२५ | भारताचे संविधान कायदा - २ | २.३० ते ५.०० |
| १६/०५/२०२५ | गुन्हेगारीशास्त्र / मानवी हक्क कायदा / दिवाळखोरी कायदा | २.३० ते ५.०० |

**१७ मे रोजी** DPC - I **आणि** DPC - II रोजी परीक्षा घेण्यात आली.

**विद्या प्रसारक मंडळाच्या टीएमसी विधी महाविद्यालयाचा पन्नासाव्या बॅचचा पदवी प्रदान सोहळा साजरा.**

दिनांक १७ मे २०२५, विद्या प्रसारक मंडळ टीएमसी विधी महाविद्यालय या प्रसिद्ध महाविद्यालयाचा पन्नासाव्या बॅचचा 'पदवी प्रदान सोहळा' सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री अभय ओक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ठाणे जिल्हा न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री एस बी अग्रवाल, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री ईश्वर सूर्यवंशी, महाराष्ट्र व गोवा अधिवक्ता मंडळाचे माजी अध्यक्ष श्री गजानन चव्हाण आणि श्री सुदीप पासबोला, तसेच विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि सचिव श्री अभय मराठे यावेळी मंचावर उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी सर्व अतिथींचे स्वागत करून या सोहळ्याची प्रस्तावना मांडली. ठाणे जिल्हा न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'विधी व्यवसाय हा फार कष्टाने व नियमित अभ्यासानेच करता येतो. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये विधीचा अभ्यास नियमितपणे सुरू ठेवावा व नवनवीन न्याय निर्णय वाचत रहावे' असा सल्ला देऊन या व्यवसायात पदार्पण करणाऱ्या या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र व गोवा राज्य अधिवक्ता मंडळाचे माजी अध्यक्ष श्री गजानन चव्हाण व सुदीप पासबोला यांनी, 'विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर अधिवक्ता मंडळ त्यांना मदत करील' अशी ग्वाही दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी त्यांच्या मनोगतात अपेक्षा व्यक्त केली की, 'विधीशी संबंधित सर्व पुस्तके, माहिती व न्याय निर्णय हे सामान्य नागरिकांसाठी मराठी भाषेमध्ये असणे फार आवश्यक आहे व यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे व मराठी भाषेमध्ये कायद्याचे रूपांतर करून सामान्य नागरिकास ते उपलब्ध करून द्यावेत'. सोहळ्याचे प्रमुख अतिथी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री अभय ओक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की, 'विधि व्यवसाय हा आज जगभरात सर्वाधिक मागणी असलेला व्यवसाय झालेला असून, या व्यवसायाने अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. अगोदरच्या काळामध्ये विधी पदवी घेतल्यानंतर वकिली हा एकमेव व्यवसाय उपलब्ध असायचा. परंतु आता विधी पदवीनंतर अनेक प्रकारच्या संधी विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहेत. जसे वकिली, न्यायव्यवस्थेमध्ये न्यायाधीश होणे, जसे की प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा न्यायाधीश, कंपन्यांमध्ये विधी अधिकारी म्हणून कार्य करणे आणि विशेष कारणासाठी निर्माण केलेल्या न्यायालयामध्ये वकिली करणे, सरकारी वकील, याशिवाय विधी महाविद्यालयामध्ये अध्यापक ही संधी उपलब्ध आहे.' श्री ओक यांनी असेही सांगितले की, 'मागील तीन वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने पुढाकार घेऊन इंग्रजीमध्ये दिलेल्या निर्णयाचा भारतातील प्रमुख भाषेमध्ये भाषांतर करण्याचा निर्णय घेतलेला असून, आज पर्यंत हजारो न्याय निर्णय भारताच्या अनेक भाषांमध्ये भाषांतरित केलेला आहे. तसेच मागील ३० वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये जिल्हा न्यायालयापर्यंत मराठीमध्येच काम केले जाते.'

स्वतःचे अनेक अनुभव सांगून वकिली व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी कोणकोणत्या कौशल्याची आवश्यकता आहे याचीही माहिती यावेळी श्री ओक यांनी दिली. 'आज उपलब्ध असलेल्या साधनांमुळे कायद्याचा अभ्यास करणे, शोध करणे, त्याचा अर्थ समजून घेणे व कमी वेळात अनेक न्यायनिवाडे यांचे आकलन करणे फार सोपे झाले असल्याचे' त्यांनी सांगितले. या साधनाचा योग्य उपयोग करून विद्यार्थ्यांनी कायद्याचा योग्य तो अभ्यास करून वकिली व्यवसायामध्ये यशस्वी व्हावे अशी शुभेच्छा त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विधी महाविद्यालयाच्या १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी ४ दिव्यांग विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक श्री. ओक साहेबांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा कामत यांनी केले, तसेच ओळख श्री विनोद वाघ, श्री यतीन पंडित व श्रीमती हेतल मिशेरी यांनी करून दिली व आभार प्रदर्शन डॉ. रूपाली जामोदे यांनी केले.









LL.M **सत्र – I २२ मे ते ३० मे रोजी घेण्यात आली**

| **दिनांक** | **विषय** | **वेळ** |
|---|---|---|
| २२/०५/२०२५ | भारतातील कायदा आणि सामाजिक परिवर्तन | २.३० ते ५.०० |
| २६/०५/२०२५ | भारताचे संविधान कायदा: नवीन आव्हाने | २.३० ते ५.०० |
| २८/०५/२०२५ | संविधानवाद: बहुलवाद आणि संघराज्यवाद | २.३० ते ५.०० |
| ३०/०५/२०२५ | राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था आणि कायद्याचे राज्य | २.३० ते ५.०० |

**देशभक्ती सप्ताह:**

दिनाक ११ मे रोजी सह-संचालक, पनवेल ह्यांच्या द्वारे online घेण्यात आलेल्या मीटिंग मध्ये देण्यात आलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयात देशभक्ती सप्ताह दिनाक १२ ते १८ मे ह्या दरम्यान साजरा करण्यात आला. द्वितीय व तृतीय वर्ष विधीच्या सत्र परीक्षा दिनाक ७ मे पासून सुरू होत्या त्या दरम्यान शक्य तितके कार्यक्रम देशभक्ती सप्ताह च्या निमित्ताने घेण्यात आले. काही स्पर्धा व व्याख्याने घेण्यात आली त्यांची माहिती खालील प्रमाणे :

**राष्ट्रीय सुरक्षेप्रती नागरिकांचे कर्तव्य. श्री शुभाष कुमार, वायुसेना**

श्री सुभाष कुमार, वायुसेना ह्यांनी 'राष्ट्रीय सुरक्षेप्रती नागरिकांचे कर्तव्य' ह्या विषयावर विद्यार्थ्यांना दिनाक १३ मे रोज संबोधित केले. श्री सुभाष हे सध्या राजस्तान सीमेवर तैनात असलेल्या सैन्यात होते, त्यांनी सर्व

नागरिकांना शांत पण सतर्क राहण्याचे आवाहन केले. त्यांनी आश्वासन दिले की, भारतीय सैन्य आपल्या मातृभूमीची आणि नागरिकांची काळजी घेण्यासाठी सुसज्ज आहे. त्यांनी असेही सांगितले की, 'दोन्ही देशांमधील तणाव अजूनही आहे, परंतु आपण सर्वांनी शांत आणि सतर्क राहिले पाहिजे', योग्य स्वसंरक्षण प्रशिक्षण घेतले पाहिजे आणि गरज पडल्यास देशाची सेवा करण्यास तयार राहिले पाहिजे. त्यांनी आपल्या कामातील आठवणी व अनुभव सांगून विद्यार्थ्यांना देशसेवेसाठी प्रोत्साहित केले. सदर कार्यक्रमास १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

**राष्ट्रीय एकात्मता राखण्याबाबत शपथ :**

दिनाक १३ मे रोजी सर्व विद्यार्थांना राष्ट्रीय एकात्मता राखण्याबाबत शपथ देण्यात आली.

'मी, भारत एक महान राष्ट्र आहे हे जाणतो. भारत माझा देश आहे. सर्व भारतीय माझे बंधू आणि भगिनी आहेत. माझे माझ्या देशावर प्रेम आहे, आणि माझ्या देशाची आणि माझ्या लोकांची प्रतिष्ठा व समृद्धी जपण्याचा मी प्रतिज्ञा करतो. मी नेहमी माझ्या देशासाठी माझे सर्वस्व देईन. मी माझ्या देशाच्या नागरिकांशी सौजन्याने आणि आदराने वागेन. मी माझ्या देशाचे ऐक्य, एकता आणि शांती जपण्याचा नेहमी प्रयत्न करीन. भारत माता की जय.!'

सर्व विद्यार्थांनी सह. प्राध्यापक कृष्णा कामत ह्यांच्या पाठोपाठ पुनरावृत्ती करत शपथ ग्रहण केली.

**देशभक्ती गीत स्पर्धा**

देशभक्ती सप्ताह साजरा करण्यासाठी 'देशभक्ती गीत स्पर्धा' गुगल मीट प्लॅटफॉर्मवर दिनाक १४ मे रोजी २०२५ सायंकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग सदर स्पर्धेत नोंदवला व अनेक देशभक्ती पर गीते सादर केली.

विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी स्फोटक विभागातील माजी लष्करी हवालदार श्री अरुण मोहिते प्रमुख यांना पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. डॉ श्रीविद्या जयकुमार यांनी श्री मोहिते यांचे स्वागत केले. श्री मोहिते यांनी युद्ध परिस्थितीत नागरिकांनी कसे वागेल पाहिजे आणि सांप्रदायिक हक्कांचा आदर कसा केला पाहिजे हे सांगितले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन, आयोजक आणि परीक्षक सहाय्यक प्रा. हेतल मिशेरी यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यांनी पाहुण्यांना काही प्रश्न विचारले आणि प्रश्नांची समानधारक उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाचे परीक्षक सहाय्यक प्रा. हेतल मिशेरी यांनी केले.

सदर स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे :-

१. मिलिंद फडके

२. कु. आरती चालक

३. श्री. विवेक पाटील

**देशभक्ती आणि राष्ट्रीय कर्तव्य – लघु उत्तर स्पर्धा**

महाविद्यालयामार्फत एक लघु उत्तर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गुगल फॉर्म द्वारे विद्यार्थ्यांकडून उत्तरे मागवण्यात आली. १२ मे सायंकाळी ४ पर्यंत विद्यार्थ्यांना उत्तरे पाठवण्यासाठी वेळ देण्यात आला होता. सदर स्पर्धेचा विषय 'देशभक्ती आणि राष्ट्रीय कर्तव्य'चा असा होता. ५० शब्दांत विद्यार्थ्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यास सांगण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना प्रभावी लेखनाद्वारे राष्ट्राप्रती त्यांचे विचार आणि वचनबद्धता व्यक्त करण्यास प्रोत्साहित करणे हा होता. कायद्याच्या विद्यार्थ्यांमध्ये 'देशभक्ती मूल्ये आणि नागरी भावना जोपासणे' हा या उपक्रमाचा उद्देश होता.

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांनी ह्यात सहभाग घेतला एकूण ३९ उत्तरे प्राप्त झाली होती.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी विजेत्यांची निवड केली. विजेत्या विद्यार्थांची नावे खालील प्रमाणे :

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | राहुल वेश्विकार (द्वितीय वर्ष विधी)<br>वैष्णवी वाघ (तृतीय वर्ष विधी) |
| द्वितीय क्रमांक | अमोल जोशी (तृतीय वर्ष विधी)<br>सुनील कदम (द्वितीय वर्ष विधी) |
| तृतीय क्रमांक | सौरभ सावंत (प्रथम वर्ष विधी) |

सर्व स्पर्धकांनी अपवादात्मक अंतर्दृष्टीं आणि देशभक्तीचा उत्साह दाखवला. प्रवेशिकांमधून सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीयप्रेमाची तीव्र भावना दिसून आली. समकालीन भारतातील देशभक्तीच्या अर्थाबद्दल विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या विविध दृष्टिकोनांचे प्राध्यापकांनी कौतुक केले.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती मूल्ये जागृत करण्यात आणि सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यात ही स्पर्धा एक जबरदस्त यश होती. अशा उपक्रमांमुळे राष्ट्राशी भावनिक संबंध दृढ होतात आणि जबाबदार नागरिकाच्या कर्तव्याबद्दल जागरूकता निर्माण होते.



विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह तिरंगा हाती घेऊन, 'भारत माता की जय, Many Faces, One Nation. Harmony in Diversity, Strength in Unity, एक भारत श्रेष्ठ भारत' अशा प्रकारे घोषणा दिल्या. संपूर्ण सप्ताह विविध कार्यक्रम स्पर्धा राबवून महाविद्यालयाने देशभक्ती सप्ताह साजरा केला. महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वांनी सहभाग नोंदवला.

**सदर कार्यक्रमास खालील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली.**

डॉ श्रीविद्या जयाकुमार (सहयोगी प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्य), प्रो. विनोद वाघ (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. रुपाली जामोदे (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. चांदणी घोगरे (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. मनोजकुमार नाईक (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. शिवाजी बिबे (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. प्रेरणा वसावे (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. हेतल मिशेरी (सहाय्यक प्राध्यापक), प्रो कृष्णा कामत (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. अंबर जोशी (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. विद्या गायकवाड (सहाय्यक प्राध्यापक), प्रो. महेश बर्वे (सहाय्यक प्राध्यापक), प्रो.यश वझे (सहाय्यक प्राध्यापक).

**देशभक्ती सप्ताह सहभागी झालेले शिक्षकेतर कर्मचारी**

सौ. शितल सोनावणे (ग्रंथपाल), सौ. रंजन करंदीकर (कार्यालयीन अधीक्षक), श्री. मुकेश राणे (लिपिक), श्री.किरण डागळे (लिपिक), श्री. संतोष बोरघरे (लिपिक), श्री. रामेश्वर चव्हाण (लिपिक), कु. रश्मी पाटील (लिपिक), श्री. संतोष झुगरे (ग्रंथपाल परिचर), श्री. शुभम पवार (ग्रंथपाल परिचर), श्री.राकेश पाथरे (शिपाई), सौ. आशा पाथरे (शिपाई), श्रीमती संगीता पवार (शिपाई), श्री. विघ्नेश पवार (शिपाई).

**पदोन्नती:** – रंजन करंदीकर ह्यांची 'कार्यालयीन अधीक्षक' पदावर पदोन्नती झाली.





मुकेश राणे ह्यांची वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती झाली.


**वि.प्र.मं.चे विधी महाविद्यालय आयोजित आठ दिवसांचा शिक्षक विकास कार्यक्रम (FDP)**

वि प्र मं चे विधी महाविद्यालय, ठाणे येथे दिनांक ९ मे ते १६ मे २०२५ दरम्यान शिक्षक विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची वेळ दुपारी २.३० ते संध्याकाळी ८.०० अशी होती. या कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. श्रीविद्या जयकुमार (प्रभारी प्राचार्य) होत्या, तर सह-समन्वयक डॉ. रुपाली श्याम जमोदे (सहाय्यक प्राध्यापक) होत्या.

**पहिला दिवस - ९ मे २०२५**

- सत्र १ : उद्‌घाटन समारंभ

उद्‌घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे बॉम्बे उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती अनिल आर. जोशी होते. त्यांनी आपल्या भाषणात कायदा शिक्षकांची बदलती भूमिका, घटनात्मक मूल्यांचा समावेश आणि समाजप्रती जबाबदारीवर प्रकाश टाकला.



- सत्र २: NAAC बायनरी प्रणाली - डॉ. कमलेश कुरणकर

या सत्रात त्यांनी NAAC मूल्यांकनाचे नवीन निकष, SSR तयारी, IDP आणि डेटा व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले.

- सत्र ३: परीक्षा सुधारणा - डॉ. श्रीविद्या जयकुमार

या सत्रात डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी महामारीनंतर आणि डिजिटल युगात परीक्षेच्या नमुन्यांमध्ये झालेल्या बदलांवर प्रकाश टाकला. त्यांनी फॉर्मेटिव्ह आणि समेटिव्ह मूल्यमापन यामधील समतोल साधण्यावर आणि मूल्यमापन हे केवळ श्रेणी देण्याचे साधन नसून, एक शिकण्याचे साधन म्हणून कसे वापरावे यावर भर दिला. या सत्रात बहुपर्यायी प्रश्न (MCQs), प्रकरण-आधारित मूल्यमापन (case-based assessments) आणि खुल्या पुस्तकावर आधारित परीक्षा (open-book exams) यांचा वाढता वापर अधोरेखित करण्यात आला. डॉ. जयकुमार यांनी प्राध्यापकांना विश्लेषणात्मक विचारसरणीला प्रोत्साहन देणाऱ्या कौशल्य-आधारित मूल्यमापनाकडे वळण्याचे आवाहन केले. त्यांनी मूल्यांकन प्रक्रियेत नैतिकतेच्या पालनाचे आणि वेळेवर निकाल प्रक्रिया होण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मची भूमिका आणि प्रशासकीय ओझे कमी करण्याची शक्यता देखील चर्चिला गेली. प्राध्यापकांनी प्रश्नपत्रिका तयार करणे, त्यामध्ये योग्य ते बदल (moderation), आणि दुहेरी मूल्यांकन (double valuation) यासंबंधी धोरणांवर विचारमंथन केले. या सत्रामुळे आधुनिक परीक्षा पद्धतीतील आव्हाने आणि संधी यावर अर्थपूर्ण विचारांची देवाणघेवाण झाली.



**दुसरा दिवस - १० मे २०२५**

- सत्र ३: कायद्यातील अध्यापन पद्धती - डॉ. रवी मोर

त्यांनी विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, क्लिनिकल लीगल एज्युकेशन, सिम्युलेशन, फ्लिप क्लासरूम्स यांचा उपयोग कसा करावा हे स्पष्ट केले.

- सत्र ४: IPC आणि BNS यावर प्राध्यापक सादरीकरणे.

विविध प्राध्यापकांनी IPC आणि नव्याने लागू झालेल्या BNS मधील तुलना सादर केली.

- सत्र ५: शैक्षणिक सहली व इंटर्नशिप्स – डॉ. मिथुन बानसोडे.

त्यांनी अनुभवाधिष्ठित शिक्षणासाठी न्यायालयीन, कारागृह आणि NGO भेटींचे नियोजन व सुरक्षितता यावर मार्गदर्शन केले.

**तिसरा दिवस – ११ मे २०२५ (रविवार)**

- सत्र ६ : कायदा कॉलेजसाठी व्यवस्थापन तत्त्वे – डॉ. कृष्णा शेट्टी.

त्यांनी शिक्षकांचे अनेक भूमिकांतील योगदान, टाइम मॅनेजमेंट, नेतृत्व कौशल्ये, टीमवर्क यावर सखोल चर्चा केली.

- सत्र ७: IPC/BNS प्रकरणांवर सखोल सादरीकरणे

नवीन संहितेतील सुधारणा, शिक्षेची तत्त्वे आणि जागतिक कायद्यांशी तुलना केली गेली.



**चौथा दिवस – १२ मे २०२५**

- सत्र ८: कायदेशीर सल्ला सेवा (Legal Consultancy) – डॉ. अनिल वरियत.

शैक्षणिक संस्थांनी कायदेशीर सल्लागार सेवा देणे कसे शक्य आहे, याचे मॉडेल्स त्यांनी मांडले.

- सत्र ९: भारतीय ज्ञानप्रणाली आणि न्यायशास्त्र – डॉ. प्रशांत धर्माधिकारी.

मनुस्मृती, अर्थशास्त्र, न्याय आणि मीमांसा शाळांचे आधुनिक कायद्यातील महत्त्व सांगितले.

**पाचवा दिवस – १३ मे २०२५**

- सत्र १०: प्रभावी अध्यापन तंत्र – डॉ. डी. के. नायक.

फ्लीप्ड लर्निंग, समावेशक शिक्षण, डिजिटल टूल्सचा वापर आणि फॉर्मेटिव्ह असेसमेंट्स यावर विशेष भर.

- सत्र ११: स्पर्धा विधी (Competition Law) – ॲड. नीतिन उपाध्ये.

त्यांनी CCI च्या केसेसद्वारे स्पर्धाविधी समजावून सांगितला आणि बिग टेक कंपन्यांवरील चर्चा केली.

**सहावा दिवस – १४ मे २०२५**

- सत्र १२: शिक्षकांची घटनात्मक मूल्यांमध्ये भूमिका – डॉ. वर्षा देशपांडे.

त्यांनी समतेचा, धर्मनिरपेक्षतेचा आणि लोकशाही सहभागाचा प्रसार शिक्षकांनी कसा करावा हे दाखवून दिले.

- सत्र १३: संशोधन आणि प्रकाशन–कौशल्ये – डॉ. श्रद्धा भोमे.

त्यांनी विषय निवड, साहित्य संकलन, शोधनिबंध लेखन आणि खोट्या जर्नल्सपासून बचाव यावर मार्गदर्शन केले.




**सातवा दिवस – १५ मे २०२५**

- सत्र १४: प्राध्यापक सादरीकरण व मूल्यांकन चाचणी.

सहभागी प्राध्यापकांनी विविध विषयांवर (शिक्षण तंत्र, कायदे सुधारणा, संशोधन प्रकल्प) सादरीकरणे केली. त्यानंतर FDP संबंधित चाचणी घेतली गेली.

सहानुभूतीच्या हजार शब्दांपेक्षा मदतीचा एक हात अधिक श्रेष्ठ असतो.



### आठवा दिवस – १६ मे २०२५

- सत्र १५: अंतिम सादरीकरणे आणि अभिप्राय.

उर्वरित प्राध्यापकांनी आपली मांडणी केली. विषयांमध्ये पाठ्यक्रम नवकल्पना, कायदेशीर क्लिनिक्स आणि लोकविधी शिक्षण यांचा समावेश होता.

**समारोप समारंभ :** प्रमुख पाहुणे केरळ उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अब्राहम मॅथ्यू यांनी 'शैक्षणिक नैतिकता, लोकशाही मूल्ये आणि शिक्षकांचा व्यापक प्रभाव' यावर मार्मिक भाषण केले.

या ८ दिवसीय FDP मध्ये प्राध्यापकांना नवीन शैक्षणिक दृष्टिकोन, सांघिक विचारांची देवाणघेवाण, आणि संशोधन प्रेरणा लाभली. कार्यक्रमाने अध्यापनातील गुणवत्ता वाढवण्यास निश्चितच हातभार लावला आहे.

एलएल.बी. तीन वर्षांच्या अनुदानित आणि विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी सीईटी नोंदणी ३१ मे २०२५ रोजी झाली.

निवडणूक कायदा परीक्षा, प्रकल्प आणि मॉडेल लोकसभा, विशेष सत्र ३१ मे आणि १ जून २०२५ रोजी संपले.

१ जून २०२५ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचे केंद्र विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय होते.

२३ मे २०२५ रोजी नवीन ६ अनुदानित शिक्षकांसाठी ७ पानांचा फॉर्म विद्यापीठाकडून मंजुरीसाठी प्राप्त झाला आहे, आता पगार जाहीर करण्यासाठी जर्नल डायरेक्टरकडे प्रक्रिया सुरू झाली आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

विद्या प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये क्लायमेट चेंज, त्याचे पर्यावरणावर होणारे परिणाम ( online course and Why waste app ) कंप्लीट करून जनजागृती केल्यामुळे TMC ने दिनांक ६/६/२०२५ रोजी पुरस्काराने सन्मानित केले.





सदर समारंभ गावदेवी मैदान ठाणे इथे संपन्न झाला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

३ मे २०२५ : ठाकूर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे बीएमएस कार्यक्रमासाठी अभ्यास मंडळाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. नीतिन जोशी यांना आमंत्रित करण्यात आले.

८ मे २०२५ : डॉ. नीतिन जोशी यांनी वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे त्यांच्या एमएमएस प्रोग्रामच्या संचालक निवडीसाठी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधी (विषय तज्ज्ञ) म्हणून भेट दिली.

१३ मे २०२५ : जर्नल आर्काइव्हज ऑफ करंट रिसर्च इंटरनॅशनल द्वारे रोल ऑफ विमेन इन ॲग्रीकल्चर विथ स्पेशियल रेफरन्स टू डब्ल्यूएसएचजीएस या शोधनिबंधासाठी समीक्षक म्हणून डॉ. स्मिता जपे यांना आमंत्रित करण्यात आले.

आयुष्यात पैसा हवा; पण पैशात आयुष्य नको.

१५ मे २०२५: पुण्यातील प्लस नाइन वन मीडिया तर्फे आयोजित ८ व्या उच्च शिक्षण नवोन्मेष आणि तंत्रज्ञान शिखर परिषद आणि पुरस्कार वितरण समारंभात डॉ. नीतिन जोशी यांना संस्थात्मक विकासातील उल्लेखनीय नेते म्हणून सन्मानित करण्यात आले.




१६ मे २०२५: डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे आणि डॉ. विभूती सावे यांनी तेलवणे इंडस्ट्रीज पॉवर इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राकेश तेलवणे यांच्या सोबत त्यांच्या प्रकल्पांसाठी सल्लामसलत बैठक घेतली.

१६ मे २०२५: ब्रिम्स कनेक्ट उपक्रमाचा एक भाग म्हणून, सहाय्यक प्राध्यापक अदिती दामले-पवार यांनी आमच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी एक विशेष संवादात्मक सत्र आयोजित करण्यात पुढाकार घेतला. आनंदी आणि समावेशक वातावरण निर्माण करण्यासाठी, 'पास द प्रेज' हा खेळ खेळण्यात आला, जिथे प्रत्येक सहभागीने दुसऱ्या सहभागी बद्दल कौतुकाचे शब्द सांगितले, ज्यामुळे सकारात्मकता आणि प्रोत्साहनाची एक साखळी तयार झाली. हा उपक्रम हास्य, उबदारपणा आणि खऱ्या कौतुकांनी भरलेला होता, ज्यामुळे आमचे अंतर्गत बंध मजबूत झाले आणि संघभावना उंचावण्यास मदत झाली.

हे सत्र ब्रिम्समध्ये कौतुकाची आणि संघात्मक मजबूत भावनेची हृदयस्पर्शी आठवण करून देणारे ठरले.





२४ मे २०२५: डॉ. स्मिता जपे यांनी ब्रीम्सचे माजी विद्यार्थिनी आणि यूबीएसची सहयोगी संचालिका; संपदा सावंत, यांच्यासोबत 'एमएमएस फायनान्समधील करिअर' या विषयावर एमएमएस विद्यार्थ्यांसाठी वेबिनार आयोजित केले.

३० मे २०२५: डॉ. स्मिता जपे यांना एशियन रिसर्च जर्नल ऑफ आर्ट्स अँड सोशल सायन्सेस तर्फे लिंग समानतेच्या धोरणाची भूमिका यावरील शोधनिबंधासाठी समीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

३१ मे २०२५: डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BRIMS) मध्ये, कौतुक आणि समावेशकतेची संस्कृती आमचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांच्या दृष्टिकोनात खोलवर रुजलेली आहे. माणसाला लवकर मान्यता मिळाल्यास आयुष्यभरासाठी त्याचा आत्मविश्वास वाढतो असा त्यांचा विश्वास होता. व त्याच विश्वासाने, कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक टप्प्यांचा एक अनोखा उत्सव साजरा करण्याची कल्पना त्यांनी योजिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक प्राध्यापक अदिती दामले-पवार यांनी हा उपक्रम विचारपूर्वक आणि यशस्वीरित्या राबवला, प्रत्येक मुलाला, त्याचे परीक्षेतील गुण आणि दर्जा विचारात न घेता त्यांच्या प्रयत्नांसाठी सन्मानित केले गेले.

एकूण १९ मुलांचा त्यांच्या अभिमानी पालकांसह सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला, सर्वच यशस्वी बाल आणि तरुणांचे त्यांच्या यशाच्या प्रवासातील प्रयत्न आणि समर्पणाची दखल घेणारा हा सोहळा खरोखरच हृदयस्पर्शी आणि समावेशक झाला. या कार्यक्रमात कुटुंबातील सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले आणि सांघिक व आपलेपणाची मजबूत भावना जोपासणाऱ्या या कार्यक्रमाचे रूपांतर आनंदी मेळाव्यात झाले.



संशोधन सहकारी शिरीन पुरोहित हिच्या सर्जनशील योगदानाने आणि मनापासून केलेल्या सहकार्याने कार्यक्रमाची शोभा वाढली, आणि आपलेपणा आला व ज्यामुळे हा कार्यक्रम अधिक संस्मरणीय ठरला.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

माहे मार्च व एप्रिल २०२५ महिन्यात महाविद्यालयातील विविध विभागांनी शैक्षणिक, औद्योगिक व सर्जनशील उपक्रमांची प्रभावीपणे आखणी व अंमलबजावणी केली. या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे अनेक उपक्रम पार पडले. याचा थोडक्यात आढावा पुढे पाहू या.

दिनांक ५ ते ११ मार्च २०२५ स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या SACE तर्फे 'पोस्टर स्पर्धा'चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा उद्देश बांधकाम, वाहतूक व दैनंदिन जीवनातील सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता.



दिनांक ७ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयात महिला सक्षमीकरणावर आधारित सेमिनार आयोजित करण्यात आले. यावेळी 'सखी वन स्टॉप सेंटर', रत्नागिरी येथील समुपदेशक ॲड. स्वरा मयेकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी आपल्या भाषणात महिलांच्या अधिकारांबाबत माहिती दिली. तसेच, समाजातील बदल घडवून आणण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने भूमिका बजावण्याचे आवाहन केले.



दिनांक ८ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी सौ. सोनी मॅडम आणि महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा. प्रीती साठे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. यामध्ये महिलांच्या सक्षमीकरणाबाबत जनजागृती करणारे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

या सत्रात प्रेरणादायी भाषणं, उत्साही नृत्य सादरीकरणं, आणि महिलांच्या सशक्तीकरणावर आधारित विचारप्रवर्तक नाट्य सादर करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांनी महिलांची ताकद, आत्मविश्वास आणि संघर्षमय प्रवास अधोरेखित केला. त्याचबरोबर वक्तृत्व स्पर्धा देखील घेण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी लिंग समानता आणि महिलांच्या हक्कांवरील आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये महिलांच्या सशक्तीकरणाबाबत जागरूकता निर्माण झाली आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश देण्यात आला.




दिनांक १२ मार्च २०२५ संगणक अभियांत्रिकी विभागाच्या सौ. राधिका कदम यांनी 'Innovating Network Communication : The Evolution of OSI Protocols' या विषयावर शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी येथे तज्ज्ञ सत्र घेतले. एकूण ४१ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

दिनांक १६ ते २३ मार्च २०२५ स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी चंदीगड, कुल्लू व मनाली येथे औद्योगिक सहलीचे आयोजन करण्यात आले. यात डोंगराळ भागातील शाश्वत बांधकाम, जलविद्युत

प्रकल्प व संरचनात्मक डिझाईन याचे निरीक्षण केले गेले.



दि. २१ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय वन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने वृक्ष दत्तक व वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणीय जाणीव वाढवणे व शाश्वत विकासाला चालना देणे हा होता. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली.



दिनांक २२ मार्च २०२५ संगणक अभियांत्रिकी विभागाने Google Meet वर पालक-शिक्षक सभा घेतली. विभागप्रमुख श्री. केतन कुंडिया यांनी विभागाच्या उपक्रमांची माहिती दिली व श्री. कृष्ण मालठणकर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर चर्चा केली.

दिनांक २४ मार्च २०२५ स्थापत्य अभियांत्रिकी व संस्था नवप्रवर्तन परिषद (IIC) यांच्या संयुक्त विद्यमाने "How to Plan Startup - Legal and Ethical Steps" या विषयावर मीना कुमारी मॅडम यांचे मार्गदर्शन झाले. एकूण ५० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन सहभाग घेतला.

दिनांक २५ मार्च २०२५ यांत्रिक अभियांत्रिकी विभागाने 'Limits, Fits Tolerances' आणि 'Career in Mechanical Engineering' या विषयांवर दोन वेगवेगळ्या अतिथी व्याख्यानांचे आयोजन पार पडले.

महाविद्यालयातील Applied Science विभागाने 'Optimization Techniques in Engineering' या विषयावर डॉ.आनंद नायक (BARC माजी वैज्ञानिक) यांचे सत्र पार पडले.



स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने 'Future Business and Career Opportunities for Civil Engineers' आणि 'Tendering Process' यावर श्री. अशोक कुमार यादव यांचे मार्गदर्शन लाभले.




संगणक विभाग व वरिष्ठ वैज्ञानिक परिषद प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांवर मार्गदर्शन व 'Data and Transforms' विषयक विशेष सत्र घेतले.

दिनांक २६ मार्च २०२५ 'Quantum Technology' या विषयावर डॉ. सुधाकर आगरकर (BARC माजी वैज्ञानिक) यांचे सत्र पार पडले.

विद्युत अभियांत्रिकी विभागात 'Entrepreneurial Insights in Power System Protection' या विषयावर बी.एस.व्ही.जी. शर्मा यांचे व्याख्यान पार पडले.

दिनांक २७ मार्च २०२५ संगणक विभागाच्या SACE (Student Association of Computer Engineering) चे उद्घाटन समारंभ संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे श्री.सुयश वाघाटे (Stacklab.in सह-संस्थापक) यांनी 'उद्योजकता' या विषयावर मार्गदर्शन केले.

असंभवनीय गोष्टी कधीच खऱ्या मानू नयेत.




दिनांक २७ ते ३१ मार्च २०२५ संगणक विभागात 'Mastering the Web' या विषयावर कार्यशाळा पार पडली. सुयश वाघाटे यांनी वेब डेव्हलपमेंटचे सखोल प्रशिक्षण दिले.

दिनांक २ एप्रिल २०२५ इन्स्ट्रुमेंटेशन विभागात पालक-शिक्षक सभा हायब्रिड पद्धतीने पार पडली. २३ पालक व ५ शिक्षक सहभागी झाले.

दिनांक ३ एप्रिल २०२५ 'Applied Science IIC' विभागात 'Raising Capital and Managing Funds for Startups' या विषयावर श्रीमती आसावरी ओक यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने अशिदा इलेक्ट्रॉनिक्स, ठाणे येथे औद्योगिक भेट दिली.




दिनांक १७ एप्रिल २०२५ 'Non-Conventional Energy Sources' या विषयावर डॉ. एन.के. नायक यांचे सत्र पार पडले.

दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी महाविद्यालयातील यांत्रिक विभागात 'Copyrights Uncovered' या विषयावर सत्र पार पडले.

दिनांक २४ एप्रिल २०२५ 'Mark the Spot - Trademark Talk' या विषयावर डॉ. राहुल तनेजा यांचे सत्र पार पडले.

दिनांक २५ एप्रिल २०२५ यांत्रिक विभागात 'IP Management for Startups' विषयावर कार्यशाळा, श्री. राहुल कुंडिया यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयातील स्थापत्य व IIC विभागात 'Significance of IP Protection Commercialization' यावर सत्र पार पडले.

दिनांक २६ एप्रिल २०२५ यांत्रिक विभागात World IP Day निमित्त 'Intellectual Property Day' याविषयावर श्री. राहुल कुंडिया यांचे मार्गदर्शन लाभले.

इन्स्ट्रुमेंटेशन विभागाचा २०२४-२५ च्या अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजला.



दिनांक १ मे २०२५ रोजी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन अत्यंत अभिमानाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा हा दिवस राज्याच्या समृद्ध इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक प्रगतीचा गौरव करणारा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय ध्वज फडकावून करण्यात आली. त्यानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताचे सामूहिक गायन झाले. ज्याने संपूर्ण वातावरण देशभक्तिपूर्ण आणि राज्याभिमानाने भारले गेले. यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. अविनाश पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी महाराष्ट्र दिनाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांना एकता, प्रगती आणि सांस्कृतिक अभिमान या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.



...

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.